❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २६६ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारितेची

दैनिक **संध्या** नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# ‘अमृत-२’ अंतर्गत सर्व कामे मार्चअखेर पूर्ण करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : पोहरा नदी पुनरुज्जीवनासह विविध कामांचा आढावा



■ नागपूर (दै. संध्या)

नागपूर शहरात ‘अमृत २’ अंतर्गत सुरू असलेली सर्व कामे मार्च २०२७ पर्यंत गतीने आणि गुणवत्तापूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. शहरात ‘अमृत २’ योजनेअंतर्गत सुरू असलेली विकासकामे आणि पोहरा नदीचे प्रदूषण निर्मूलन व पुनरुज्जीवन या महत्त्वाच्या विषयांवर रामगिरी शासकीय निवास येथे आढावा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी आमदार प्रवीण दटके, स्थायी समिती सभापती शिवाणी दाणी, महापालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर, अतिरिक्त आयुक्त अंकित, मुख्यमंत्र्यांच्या ओएसडी आशा पठाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता संभाजी माने, कार्यकारी अभियंता नीता ठाकरे, महापालिकेच्या मुख्य अभियंता लीना उपाध्ये, नगरसेवक तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान ‘अमृत 2’योजनेअंतर्गत शहरात सुरू असलेल्या रस्ते खोदकाम व त्यानंतरच्या पुनर्भरण कामांचा आढावा घेण्यात आला. बैठकीत उपस्थित नगरसेवकांनी त्यांच्या प्रभागातील खोदकाम व पुनर्भरणच्या कामाबद्दल समस्या मांडल्या. तसेच नगरसेवकांनी रिंग रोड वरील सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे सुरू असलेल्या कामाबद्दलही काही मुद्दे मांडण्यात आले. आमदार दटके यांनी नागरिकांना होणाऱ्या त्रासाबद्दल नाराजी व्यक्त केली. तसेच स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांनी पावसाळ्यात नागरिकांना झालेल्या त्रासाबद्दलची माहिती दिली. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, सिमेंट रस्त्यांवर पुनर्भरण किंवा खड्डे बुजविण्याचे काम करताना कोणत्याही प्रकारची तडजोड न करता शास्त्रीय व वैज्ञानिक पद्धतीचा सक्तीने अवलंब करावा. भविष्यात शहरात होणाऱ्या रस्ते खोदकाम आणि त्यानंतरच्या पुनर्भरण प्रक्रियेसंदर्भात संबंधित सर्व विभागांची संयुक्त बैठक बोलावून एक सर्वसमावेशक ‘धोरण’ तयार करावे, याशिवाय संबंधित विभागांनी योग्य समन्वयाने काम करावे. कामात कुचराई करणाऱ्या अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर सक्त कारवाई करण्याची ताकीदही मुख्यमंत्र्यांनी दिली. बैठकीत मनपा आयुक्त डॉ. इटनकर यांनी संगणकीय सादरीकरण करीत ‘अमृत 2’ योजनेच्या कामांसोबतच आणि पोहरा नदीचे प्रदूषण निर्मूलन व पुनरुज्जीवन प्रकल्पावरही सविस्तर माहिती दिली. यावेळी त्यांनी विविध ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या सिव्हरेज ट्रीटमेंट प्लांट(एसटीपी) बद्दलची माहिती दिली. जयताळा येथे 10 एमएलडी, चिखली येथे 35 एमएलडी एसटीपी उभारण्यात येणार असून, चिंचभवन, बीडीपेठ, सोमलवाडा येथे पंपिंग स्टेशन उभारण्यात येणार असल्याचे यावेळी सांगितले.

# बैठकीत खाण्यापेक्षा बांधावर खा!

### संतप्त शेतकऱ्यांनी कृषिमंत्र्यांनाच दिली काजू-बदामाची प्लेट; भरणेंचा ताफा अडवला

■ हिंगोली (दै. संध्या)

मराठवाड्यात पावसाने दडी मारल्याने अनेक भागांत शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. पावसाअभावी पिके करपल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे मराठवाड्याच्या दौऱ्यावर आहेत. शनिवारी त्यांनी हिंगोली जिल्ह्यातील काही भागांत जाऊन शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचत पिकांची पाहणी केली. मात्र, यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी कृषिमंत्र्यांचा ताफा अडवत सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. शेतकऱ्यांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना एका बशीत काजू-बदाम भरून दिले. नांदेडमधील दुष्काळी आढावा बैठकीत मंत्री आणि लोकप्रतिनिधी काजू-बदाम खात असल्याचा व्हिडिओ समोर आल्यानंतर शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. त्याच पार्श्वभूमीवर हिंगोलीत शेतकऱ्यांनी कृषिमंत्र्यांना काजू-बदाम देत आपला संताप व्यक्त केला. यावेळी 'बैठकीत बसून काजू-बदाम खाऊ नका, शेतकऱ्यांच्या प्रश्नांना ठोस उत्तर द्या,' अशा शब्दांत शेतकऱ्यांनी भरणेंना जाब विचारला. यंदा पावसाने सुरुवातीला काही काळ चांगली हजेरी लावली असली, तरी त्यानंतर मोठा खंड पडल्याने राज्यातील अनेक भागांत पिकांवर संकट आले आहे. काही भागांत उभी पिके करपली असून शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाच्या लहरीपणामुळे हिरावला जात



असल्याची परिस्थिती आहे. यामुळे शेतकऱ्यांकडून नुकसानभरपाई, तातडीची आर्थिक मदत, कर्जमाफी तसेच दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली जात आहे. नांदेडमध्येही कृषिमंत्र्यांच्या ताफ्यासमोर शेतकऱ्यांनी घोषणाबाजी करत कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची आणि संपूर्ण कर्जमाफीची मागणी केली. हिंगोलीमध्ये पाहणीसाठी आलेल्या कृषिमंत्र्यांना शेतकऱ्यांनी घेराव घातला. यावेळी शेतकऱ्यांनी त्यांच्यासमोर काजू-बदामाची बशी ठेवत नांदेडमधील बैठकीतील प्रकाराचा निषेध केला. अशा शब्दांत शेतकऱ्यांनी आपला रोष व्यक्त केला. हिंगोली जिल्ह्यातील टाकळगाव परिसरात नुकसानीची पाहणी करताना हा प्रकार घडला. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संदेश देशमुख यांच्यासह काही शेतकऱ्यांनीही कृषिमंत्र्यांच्या दौऱ्यादरम्यान निषेध व्यक्त केला.

## थोडक्यात...

### आत्महत्याप्रकरणाची सखोल चौकशी करा

पुणे : दैनिक संध्या

शिवसेना नेत्या आणि महाराष्ट्र विधान परिषद सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शुभांगी अभिजीत गरड यांच्या आत्महत्या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. करमाळा तालुक्यातील वरकुटे येथील शुभांगी गरड यांच्या आत्महत्येची चौकशी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली निष्पक्ष आणि वेळेत पूर्ण करावी, असे त्यांनी म्हटले आहे. याबाबत डॉ. गोऱ्हे यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तांना निवेदन दिले आहे. शुभांगी गरड (वय ४०) यांनी १३ सप्टेंबर २०२६ रोजी पुण्यातील चंदननगर परिसरात असलेल्या त्यांच्या घरी आत्महत्या केली. त्यांचा विवाह जुलै २०२५ मध्ये झाला होता. शुभांगी यांच्या माहेरच्या कुटुंबीयांनी आरोप केला आहे की, लग्नानंतर त्यांना हुंड्यासाठी त्रास दिला जात होता. तसेच, त्यांचा शारीरिक आणि मानसिक छळ केला जात होता. या प्रकरणी चंदननगर पोलीस ठाण्यात शुभांगी यांच्या पतीसह सासरच्या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८ आणि ८५ नुसार हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी पतीला ताब्यात घेतले आहे. उर्वरित आरोपींच्या सहभागाचीही सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. डॉ. गोऱ्हे यांनी मागणी केली आहे की, शुभांगी यांचा मोबाईल, व्हॉट्सअॅप संदेश, कॉल रेकॉर्ड, आर्थिक व्यवहार आणि सीसीटीव्ही फुटेज यांसारखे सर्व डिजिटल पुरावे तातडीने सुरक्षित करावेत.

# आदित्य ठाकरेंवर आरोप करणाऱ्यांकडे एकजरी पुरावा असेल तर दाखववावा

### मग बोलावं, वरुण सरदेसाईंनी सर्व आरोप फेटाळले

■ मुंबई (दै. संध्या)

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे वांद्रे पूर्व मतदारसंघाचे आमदार वरुण सरदेसाई यांनी दिशा सालियन मृत्यू प्रकरणावरुन सुरु असलेल्या घडामोडींवर भूमिका मांडली आहे. दिशा सालियनचे वडील सतीश सालीयन यांनी मानहानीची नोटीस देण्यासाठी वकिलांसह मातोश्री येथे पोहोचत ठाकरेंच्या वकिलांकडे नोटीस सोपवली. यापूर्वी आमदार वरुण सरदेसाई यांनी भूमिका मांडताना आदित्य ठाकरे ‘त्या’ लोकांना ओळखत देखील नव्हते. राजकीय प्रतीमा मलीन करण्याचा प्रकार असल्याचं वरुण सरदेसाई यांनी म्हटलं. एकतरी पुरावा आहे का तुमच्याकडे? तपासात काय ते पुढे येईल परंतु आता आदित्य ठाकरेंच्या विरोधात पुरावा आहे का? CBI चौकशी होऊ द्या काय ते पुढे येईल, असं वरुण सरदेसाई म्हणाले. दिशा सालियान यांचे वडील सतीश सालियान यांच्याकडून आमदार आदित्य ठाकरे यांच्यावर सुरू असलेले आरोप आमदार वरुण सरदेसाई यांनी फेटाळून लावले आहेत.आदित्य ठाकरे हे सुशांत सिंग आणि दिशा सालियान यांना ओळखत नव्हते. दिशा सालियान यांचे वडील सतीश सालियान यांच्याकडून फक्त प्रसिद्धी मिळवण्यासाठी आरोप सुरू आहेत. प्रसिद्धी मिळवण्यासाठी ते मातोश्रीवर नोटीस देण्यासाठी येत आहेत,यामध्ये आदित्य ठाकरे यांचा काही संबंध नाही असं वरुण सरदेसाई यांनी सांगितलं. मोठ्या तरुण नेत्याला



बदनाम करण्यासाठी हा आरोप केला जात आहे. महायुती सरकार असताना SID च्या माध्यमातून तपास झाला होता. पोलिसांनी पाच वेळा त्यांच्या वडिलांना नोटीस देऊन जबाब नोंदवण्यासाठी बोलावलं होतं.

पण ते आले नव्हते, कोर्टामध्ये 18 पानांचं सरकारने AFFIDAVIT फाईल केला आहे. त्यामध्ये देखील आदित्य ठाकरे यांचा काही रोल नसल्याचे सांगण्यात आले आहे. आदित्य ठाकरे संदर्भात आरोप करणाऱ्या व्यक्तींकडे एकही पुरावा असेल तर समोर आणावा. फक्त मीडियामध्ये प्रसिद्धी मिळवण्यासाठी बदनाम करणे हे आता थांबवावं, असं वरुण सरदेसाई यांनी म्हटलं. दिशा सालियन ही अभिनेता सुशांत सिंग राजपूत याची मॅनेजर होती. तिने 8 जून 2020 ला 12 व्या मजल्यावरुन पडून तिचा मृत्यू झाला होता. त्यानंतर 14 जून 2020 ला अभिनेता सुशांत सिंह राजपूत यानं देखील आत्महत्या केली होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानं दिशा सालियन मृत्यू प्रकरणी दिशाचे वडील सतीश सालियन यांच्या तक्रारीवरुन एफआयआर दाखल झाली आहे. आरोपी म्हणून एफआयआरमध्ये कोणाचं

# ‘कॉमन मॅन’ची ताकद दाखवून देऊ : सतीश सालियान

### दिशा सालियानच्या वडिलांचा थेट ‘मातोश्री’वर मोर्चा, ठाकरेंच्या वकिलांनी अब्रूनुकसानीची नोटीस स्वीकारली



■ मुंबई (दै. संध्या)

दिशा सालियान मृत्यू प्रकरणात दररोज नवनवीन धक्कादायक घडामोडी समोर येत असून, आता तिचे वडील सतीश सालियान यांनी आदित्य ठाकरे आणि अनिल देशमुख यांच्यावर अब्रुनुकसानीचा दावा ठोकला आहे. आदित्य ठाकरे यांनी या प्रकरणाबाबत केलेल्या सोशल मीडिया पोस्टनंतर हे पाऊल उचलण्यात आले असून, याच दाव्याची नोटीस देण्यासाठी सतीश सालियान यांनी आज थेट ठाकरेंच्या 'मातोश्री' निवासस्थानावर मोर्चा काढला.

सतीश सालियान हे वकिलांच्या टीमसोबत मातोश्रीच्या मुख्य प्रवेशद्वारावर पोहोचल्यानंतर शिवसैनिकांनी त्यांना अडवले. तसेच गेट देखील बंद करण्यात आले होते. यावेळी सालियान यांच्या वकिलांनी 500 कोटींच्या अब्रूनुकसानीची नोटीस आदित्य ठाकरे यांच्या वकिलांना दिली.

माध्यमांशी बोलताना दिशाच्या वडिलांनी मोठा दावा केला आहे, ते म्हणाले, उशीर का होईना सीबीआयने गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. मुंबई पोलिसांच्या चुकीच्या गोष्टीने सर्व बनाव रचून ही केस दाबण्याचा प्रयत्न केला. कॉमन मॅनची ताकद आम्ही दाखवू, असा इशारा सतीश सालियान यांनी दिला आहे. ते म्हणाले, मी आज मातोश्रीवर पत्र घेऊन जाणार आहे. त्या सरकारमध्ये असलेल्या नेत्यांच्या सांगण्यावरून पोलिसांनी हे सर्व केले. मात्र आम्हाला न्यायची अपेक्षा आहे, असे त्यांनी म्हटले आहे. वकील निलेश ओझा म्हणाले या प्रकरणावर बोलताना म्हणाले, त्यांनी आम्हाला धमक्या दिल्या, तुम्ही येऊन दाखवा, नोटीस देऊ देणार नाही, बघून घेऊ, त्यामुळे आम्ही स्वतः जाणार आहोत. नाहीतर आम्ही न्यायालयामार्फत नोटीस देऊ शकत होतो. आमच्याकडे जो सर्वात मोठा पुरावा होता, तो व्हिडिओचा होता आणि आम्ही तो सीबीआयला कालच दिला आहे. त्यामुळे आता तसा तपास होईल. हायकोर्टच्या निर्देशानुसार आता तपास होणार आहे. सुप्रीम कोर्टात देखील आम्ही सर्व काही दिले आहे, आम्हाला विश्वास आहे की आता आम्हाला न्याय मिळेल, असे त्यांनी म्हटले आहे. या प्रकरणावरून मंत्री नितेश राणे यांनी आदित्य ठाकरे आणि संजय राऊत यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे.

आदित्य ठाकरे ड्रग्स सेवन करतायत असे आम्ही ऐकतोय आणि त्याचा साठा संजय राऊतला दिलेला दिसतोय. ते नेहमीसारखे वेड्यासारखे करतायेत. किती वर्ष तीच टेप रेकॉर्डर आम्ही ऐकतोय. एवढी वर्षे तुमची सत्ता होती, तेव्हा तुम्ही चौकशी का केली नाही? तुम्हाला कोणी थांबवले होते? स्वतः उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना चौकशी का केली नाही? लोकही आता याला कंटाळले आहेत.

### ‘ही एका बापाची लढाई, संजय राऊतांनी गप्प बसावे’

या प्रकरणात राजकारण न आणण्याचे आवाहन करत नितेश राणे पुढे म्हणाले की, संजय राऊत किंवा उबाठाचे लोक जेवढे तोंड उघडतील, तेवढा मालकाचा मुलगा अडचणीत येणार आहे. आम्हाला यात बिलकुल राजकारण करायचे नाही. ही एका बापाची आपल्या मुलीसाठी असलेली लढाई आहे. यामध्ये कोणत्याही राजकीय व्यक्तीने येऊ नये. सतीश सालियान जे करत आहेत, ते त्यांच्या मुलीसाठी करत आहेत. ही लोकं जेवढी बोलतील, त्यामुळे आदित्य ठाकरेंना अटक करावी लागेल. तसेच, मी संजय राऊतांना मैत्रीचा सल्ला देईन की, त्यांनी कृपया गप्प बसावे आणि आपल्या मालकाच्या मुलाला सुरक्षित ठेवावे, असा इशाराही त्यांनी दिला.

# सरकार तुमच्या दारावर टकटक करणार त्याची सुरुवात झाली

### *UPI वरील नव्या शुल्कावरून राज ठाकरेंचा केंद्रावर घणाघात*

■ मुंबई (दै. संध्या)

उच्च-मूल्याच्या UPI व्यवहारांवर 15 ऑक्टोबर 2026 पासून नवीन मर्चंट डिस्काउंट रेट म्हणजेच MDR लागू होणार आहे. सरकारच्या या निर्णयावरून विरोधकांनी टीकेची झोड उठवली आहे. यावर आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी देखील टीका केली आहे. मी गेली अनेक वर्ष सांगतोय गाफील राहू नका, हे सरकार तुमच्या दारावर टकटक करणार, आणि त्याची सुरुवात झाली असल्याची टीका राज ठाकरे यांनी केली आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर आपले मत व्यक्त करत सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले, केंद्र सरकारने युपीआय व्यवहारांवर 'मर्चंट डिस्काउंट रेट' अर्थात सोप्या भाषेत युपीआय व्यवहारांवर अगदी सरसकट नाही पण शुल्क लावून भारतीयांवर मग ते व्यापारी असोत की ग्राहक यांच्यावर, 'डिजिटल सापळा' लावला आहे. आधी नोटबंदी करून मग आता आम्ही कसं डिजिटल व्यवहाराला चालना देतोय हे दाखवत युपीआय व्यवस्था आणली. मग त्याचा गाजवजा केला, स्वतःची स्तुती करून घेतली,



लोकांना सवय लावली आणि अचानक एकेदिवशी घोषित करून टाकलं की आता या व्यवहारांवर शुल्क लागेल. थोडक्यात नागरिकांना गुंगवत ठेवलं आणि हळूच 'डिजिटल सापळ्यात' पकडलं. मी गेली अनेक वर्ष सांगतोय की गाफील राहू नका किंवा सगळं किती आलबेल आहे आणि किती छान सुरु आहे असं अजिबात मानू नका. तुमच्या दारांवर हे सरकार कधीतरी टकटक करणार. आणि त्याची सुरुवात झाली आहे. राज ठाकरे पुढे म्हणाले की, सरकारने डिजिटल व्यवहारांसाठी युपीआय व्यवस्था आणली. तिला प्रतिसाद मिळेल असं बघितलं आणि तिला प्रतिसाद मिळाला हे सगळं ठीक आहे. पण जर हेतू डिजिटल पेमेंट व्यवस्था आणून आर्थिक देवाणघेवाण सोपी करणं इतका स्वच्छ होता, तर ज्या दिवशी या पेमेंटच्या इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये गुंतवणूक केली तेंव्हाच ती चालत राहावी आणि सामान्य माणसांच्या खिशाला झटका बसू नये म्हणून तरतूद का नाही केली ? अशा पेमेंट व्यवस्थांसाठी दीर्घकालीन देखभाल असो की सायबर सुरक्षा असो यासाठी पैसा लागणार मग त्याची तरतूद अर्थसंकल्पात कायम स्वरूपी का नाही केली? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. तसेच ग्राहकांनी २००० रुपयांपेक्षा जास्तीची खरेदी केली ०.४% एमडीआर लागू होणार ? आणि सरकारचं म्हणणं आहे की हा भार व्यापाऱ्यांनी सोसायचा, काय खात्री आहे की व्यापारी हा भार सोसतील आणि ग्राहकांच्या माथी तो मारणार नाहीत ? यासाठी काही यंत्रणा सरकारकडे आहे का ? उत्तर आहे अजिबात 'नाही'.

पुन्हा सध्याच्या अर्थमंत्री बाईंना श्वासोच्छवासावर शक्य नाही म्हणून अन्यथा त्यावर पण त्यांना १८% जीएसटी लावायचा आहे. त्यामुळे त्यांनी या एमडीआरवर पण जीएसटी लावला आहे. थोडक्यात जमेल तिथून नागरिकांच्या खिशात हात घालत आहेत. पंतप्रधान मोदी परदेशांत जाऊन युपीआयची जाहिरातबाजी करायचे आणि स्वतःची पाठ थोपटवून घ्यायचे, ते आता परत जेंव्हा परदेशांत जातील तेंव्हा मी कसा एमडीआर आणि जीएसटी लावला हे पण हसून हसून सांगणार का? असा खोचक सवाल राज ठाकरे यांनी केला आहे. काँग्रेस पक्षाने आरोप केला आहे की हे सगळं अमेरिकन सरकारच्या दबावाखाली केलं आहे म्हणून. मला त्याबद्दल माहित नाही. पण हा निर्णय घेताना केंद्र सरकारने कोणाशी सल्लामसलत केली, किंवा परदेशी कार्ड कंपन्या आणि जागतिक पेमेंट व्यवस्था यांची अस्वस्थता नव्हती असं सरकार ठाम सांगू शकेल ? उत्तर नाही असं आहे. सरकारवर कुठून तरी दबाव असेल, त्यांनी त्याचा फायदा स्वतःची तिजोरी भरून काढायला वापरला, असे राज ठाकरे म्हणाले.



# संपादकीय

## कर्तव्यदक्ष पंतप्रधान नरेंद्र मोदी

*पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या देशभराहून अधिक काळाच्या नेतृत्त्वाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे स्थैर्य आणि राजकीय सातत्यासोबत राष्ट्रीय धोरणाची सुस्पष्ट दिशा अशीच करावी लागेल. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाचा मुख्य आधार म्हणजे, स्थैर्य आणि धोरण निर्मिती तसेच भारताने आपल्या पायाभूत मूल्यांवर आणि सामर्थ्यावर उभारणी केली पाहिजे हा अढळ विश्वास भारताच्या नवअस्मितेच्या केंद्रस्थानी असलेली भारतीयत्वाची प्रबळ भावना, अहंकाराचा लवलेश नसलेला अभिमान तसेच स्वप्ने प्रत्यक्षात साकारण्याची क्षमता नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भरलेली आहे. हे नाकारता येणार नाही.*

१७ सप्टेंबर १९५० गुजरातच्या उत्तर भागातील मेहसाणा जिल्ह्यातल्या वाडनगर गावी नरेंद्र मोदी यांचा जन्म झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आजही भारतातील सर्वात लोकप्रिय नेते आहेत. नरेंद्र मोदी हे २६ मे २०१४ पासून भारताचे पंतप्रधान आहेत. गुजरातचे मुख्यमंत्री ते देशाचे पंतप्रधान असा नरेंद्र मोदी यांचा प्रवास आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जन्मलेले ते भारताचे पहिले पंतप्रधान आहेत. त्या आधी ते ७ ऑक्टोबर २००१ ते २२ मे २०१४ पर्यंत गुजरात राज्याचे मुख्यमंत्री होते. भाजपच्या गुजरात विधानसभा २००२ ते २०१२ तसेच १९९५ व १९९८ निवडणूक विजयांमध्ये मोदींचे मोठे योगदान होते. ते २००१ च्या ऑक्टोबर मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री झाले व त्यानंतर सरळ ४ विधानसभा जिंकत मोदींनी मुख्यमंत्री पदाचा यशस्वीपणे कार्यभार पाहिला. २००९ च्या लोकसभा निवडणुकीसाठीही ते भाजपचे स्ट्रॅटेजिस्ट होते. मोदी हे हिंदुत्ववादी विचारसरणीचे नेते आहेत व संघाचे स्वयंसेवक आहेत. गुजरात च्या विकासासाठी मोदी विकासपुरुष म्हणून ओळखले जातात. त्यांच्या अर्थकारणाची प्रशंसा सर्वत्र केली जाते. त्यांच्या वडिलांचे नाव दामोदरदास मूळचंद मोदी तर आईचे नाव हिराबेन आहे. या दोघांच्या सहा अपत्यांपैकी नरेंद्र हे तिसरे अपत्य आहे. नरेंद्र मोदी यांना सहा भावंडं आहेत. मोदींना एक मोठी बहिण आणि दोन मोठे भाऊ आहेत. तर दोन धाकटे भाऊ आणि एक लहान बहिण आहे. सर्वात मोठ्या बहिणीचं नाव शारदाबेन, त्यानंतर भाऊ सोमभाई, अमृतभाई. नरेंद्र मोदींपेक्षा लहान असलेल्या भावाचं नाव प्रल्हाद मोदी, त्यानंतर बसंतीबेन आणि मग पंकज मोदी आहे.

लहानपणापासूनच त्यांच्यावर औदार्य, शौर्य आणि समाजसेवेचे संस्कार झाले. भारत-पाकिस्तान युद्धाच्या काळात, अगदी तरुण वयाचे असताना त्यांनी रेल्वे स्टेशनवर जाणाऱ्या-येणाऱ्या जखमी जवानांची शुश्रुषा केली होती. १९६७ साली गुजरातमध्ये पुराने थैमान घातले होते. त्यावेळीही पूरग्रस्तांच्या सेवेत ते अग्रभागी होते. अप्रतिम संघटनकौशल्य आणि मानवी मानसशास्त्राची उत्तम समज असणाऱ्या श्री. मोदी यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्य केले आणि गुजरातमधील अनेक सामाजिक-राजकीय चळवळींमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

मोदींनी किशोर वयात आपल्या भावासमवेत चहाचे दुकान चालविले. तरुणपणी महाविद्यालयीन शिक्षण घेतांनाच ते संघाचे पूर्ण वेळ प्रचारक बनले.१९९१ मध्ये कन्याकुमारी-श्रीनगर एकता यात्रेपासून त्यांचा राजकारणात उदय झाला.१९९५ मध्ये भाजपाचे राष्ट्रीय सचिव म्हणून त्यांनी पाच राज्यांची जबाबदारी निभावली. २००१ ते २००२ व नंतर २००२ ते २००७ तसेच २००७ ते २०१२ या काळात गुजरातचे मुख्यमंत्री. भाजपतर्फे त्यांचे सप्टेंबर २०१३ मध्ये पंतप्रधानपदाचे भावी उमेदवार म्हणून घोषणा झाली. भारतीय जनता पक्षाचे जहाल नेता यांच्यासारखा साधी चहाची टपरी चालवणारा कुशाग्र बुद्धीचा व महत्त्वाकांक्षी तरुण पंतप्रधानपदाचा प्रमुख उमेदवार बनेपर्यंत मजल गाठू शकतो, हे मोदींनीच दाखवून दिले.

नरेंद्र मोदींनी २६ में २०१४ रोजी पंतप्रधान पदाची शपथ घेतली. या पदावर पोहोचणारे रा.स्व.संघाचे ते पहिले प्रचारक तर दुसरे स्वयंसेवक ठरले. २०१४ मध्ये ते देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान झाले. एकट्या भाजपने २८२ जागांवर विजय मिळवला होता. एवढंच नाही तर उमेदवार म्हणून मोदींनी वाराणसी आणि वडोदरा या दोन मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि दोन्ही मतदारसंघात त्यांचा विजय झाला. २०१९ मधील लोकसभा निवडणुकीतील विजय २०१४ पेक्षा फारच मोठा होता. या निवडणुकीत भाजपने तब्बल ३०३ जागांवर विजय मिळवला. ३० मे २०१९ रोजी त्यांनी दुसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली.

नरेंद्र मोदींचा राष्ट्रीय राजकारणाच्या पटावरील झपाट्याने झालेला उत्कर्ष अवाक करणारा आहे. फक्त २००२ मधील गुजराथ मधल्या दंगलीने त्यांच्या सर्वपक्षीय स्वीकार्यतेस 'खो' घातल्याचे वेळोवेळी सिद्ध झाले आहे. त्यांच्या चेहर्यासवरील हा काळा डाग त्यांना पंतप्रधान बनण्यापासून रोखू शकत होता. दुसऱ्या एखाद्या नेत्यास असला आरोप खचितच अतिशय महागात पडला असता, पण नरेंद्र मोदींच्या बाबतीत तसे झाले नाही. २०१४ मध्ये ते प्रचंड बहुमताने निवडून आले आणि भारताचे पंतप्रधान बनले. याच काळात त्यांनी जगभर प्रवास केला, अनेक देशांतील महत्त्वाच्या नेत्यांबरोबर पंतप्रधान म्हणून संवाद साधला. अनेक नवीन देशांशी मैत्री जमवली. याचे उदाहरण म्हणजे मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेन.

या अनुभवांमुळे एक वैश्विक दृष्टिकोन विकसित व्हायला तर मदत झालीच; पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे भारतभूमीची सेवा करून सर्व राष्ट्रांमध्ये भारताला सामाजिक-आर्थिक दृष्ट्या सर्वोत्तम बनवण्याची त्यांच्या मनातली तळमळ अधिकच प्रखर झाली. मागच्या वाढदिवसाला पंतप्रधान मोदी गुजरातमध्ये गेले होते. सरदार सरोवर धरणावरील नर्मदा देवीच्या महाआरतीमध्ये त्यांनी सहभाग घेतला होता. तर ६८ वा वाढदिवस त्यांनी आपला मतदारसंघ वाराणसी मध्ये साजरा केला होता.

मोदी यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि त्यांच्या कार्यशैलीची भुरळ पडल्यामुळे भारतीय तसेच परदेशी लेखकांनीही मोदी यांच्याविषयीचे विपुल लेखन केले आहे. मुख्य म्हणजे ही सर्व पुस्तके २०१४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी म्हणजेच नरेंद्र मोदी हे पंतप्रधान होण्यापूर्वीची आहेत. काही पुस्तकांचे स्वतंत्र लेखन झाले असून काही पुस्तकांचे अनुवादन झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्तानं भारतीय जनता पक्षाकडून १७ सप्टेंबर २०२१ पासून पुढचे तीन आठवडे म्हणजेच ७ ऑक्टोबर २०२१ पर्यंत वेगवेगळे कार्यक्रम राबवले जाणार आहेत. यासोबतच भाजपकडून 'सेवा आणि समर्पण' मोहीम राबवण्यात येणार आहे. ७ ऑक्टोबर २००१ रोजी नरेंद्र मोदी यांनी पहिल्यांदाच गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती. मुख्यमंत्री आणि पंतप्रधान म्हणून संवैधानिक जबाबदारी निभावताना यंदा मोदी २२ वर्षांची कारकीर्द पूर्ण करत आहेत. पुन्हा २०२४ मध्ये अन्य घटक पक्षांच्या साहाय्याने श्री. मोदी पुन्हा देशाचे पंतप्रधान झाले. २०१४, २०१९ आणि २०२४ असे तीन वेळा मोदी यांनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली. आज भारताची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांचे राजकीय स्थैर्य आणि मोदी सिद्धांतातून सुरू झालेली विकास आणि प्रगतीची वाटचाल सुरू आहे मात्र अजून प्रत्येक मैलाचा प्रवास बाकी आहे १४० कोटी भारतीयासाठी सामाजिक आर्थिक आणि राजकीय न्याय हे राज्यघटनेने निर्धारित केलेले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कोणत्या मार्गाने वाटचाल करायची हे स्पष्ट करणारा मोदी सिद्धांत आपल्या भारताकडे आहे. हा आपल्या भारताचा मानबिंदू आहे भारतात सर्वाधिक काळ पंतप्रधानपद भूषवणारे लोकनियुक्त नेते जगातील ३६ राष्ट्राच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित झालेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसाच्या (१७ सप्टेंबर) शुभेच्छा.



# उवसग्गहरं स्तोत्राच्या दशकपूर्ती सोहळ्यात भाविकांची मंत्रमुग्ध साथ

■ पुरंदर (दै. संध्या)

जैन धर्मपरंपरेत परमपावन आणि संकट निवारणासाठी श्रद्धेने जपले जाणारे 'श्री उवसग्गहरं स्तोत्र'च्या सामुदायिक जापाच्या उपक्रमाने यंदा दशकपूर्तीचा टप्पा गाठला. त्यानिमित्त रविवार दि. ६ सप्टेंबर रोजी बिबवेवाडी येथील जैन स्थानकाच्या प्रांगणात भव्य आध्यात्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास सुमारे ८ हजार भाविकांनी उपस्थित राहून एकसुरात 'श्री उवसग्गहरं स्तोत्रा'चा जाप केला. सामुदायिक जापाच्या निनादाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

दुपारी चार वाजता सुरू झालेल्या या सोहळ्यात मोठ्या संख्येने जैन समाजबांधव तसेच भाविक सहभागी झाले होते. भव्य मंडपात भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने उपस्थित राहून सामुदायिक जापात सहभाग घेतला. एकाच सुरात हजारो भाविकांकडून स्तोत्राचा जाप होत असताना निर्माण झालेले आध्यात्मिक वातावरण उपस्थितांसाठी अत्यंत भावस्पर्शी ठरले.

या मंगल सोहळ्यास दिगंबर आचार्य पू. श्री प्रणामसागरजी म. सा., वाणीचे जादूगार पू. श्री रमणिकमुनिजी म. सा., वीरायतनच्या शिल्पकार आचार्य पू. श्री चंदनाजी म. सा. यांच्या सुशिष्या पू. श्री विभाजी म. सा. व पू. श्री संघमित्राजी म. सा., तसेच बिबवेवाडी येथील आर. एम. डी. स्थानकात चातुर्मास सुरू असलेल्या साध्वी पू. श्री जयश्रीजी म. सा. आदिठाणा यांच्यासह साधू-साध्वीगणांची उपस्थिती व आशीर्वचन लाभले.

आर. एम. डी. धारीवाल फाउंडेशनच्या अध्यक्षा जान्हवी धारीवाल बालन आणि उपाध्यक्षा शोभाताई धारीवाल यांच्या नेतृत्वाखाली गेल्या दहा वर्षांपासून 'उवसग्गहरं स्तोत्र' सामुदायिक जापाचा उपक्रम आयोजित केला जात आहे. यंदाच्या दशकपूर्ती सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते.

स्वागतपर मनोगतात शोभाताई रसिकलाल धारीवाल यांनी या उपक्रमामागील वैयक्तिक अनुभव सांगितला. जैन धर्मातील हजारो वर्षांच्या संस्कार आणि अध्यात्मिक परंपरेत विविध मंत्रांना विशेष स्थान आहे. त्यापैकी 'उवसग्गहरं स्तोत्र' हे संकट निवारणासाठी श्रद्धेने जपले जाते. या स्तोत्राच्या जापाचा स्वतःला सकारात्मक अनुभव आल्याचे त्यांनी सांगितले.

रसिकलालजी धारीवाल रुग्णालयात व्हेंटिलेटरवर असताना 'उवसग्गहरं स्तोत्र'च्या जापातून मिळालेल्या सकारात्मक ऊर्जेमुळे त्यांचे प्राण वाचल्याचा आपला ठाम विश्वास असल्याचे शोभाताई धारीवाल यांनी सांगितले. या अनुभवातून निर्माण झालेल्या श्रद्धेतून गेल्या दहा वर्षांपासून हा सामुदायिक जापाचा उपक्रम अखंड सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

दशकपूर्ती सोहळ्यात केवळ धार्मिक आणि आध्यात्मिक उपक्रमांनाच महत्त्व न देता सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमांचीही जोड देण्यात आली. सोहळ्याच्या ठिकाणी खास पुस्तक स्टॉल उभारण्यात आला होता. या स्टॉलवरून भाविकांना विविध आध्यात्मिक व धार्मिक विषयांवरील पुस्तकांचे मोफत वाटप करण्यात आले.

तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी सुमारे २०० भारतीय प्रजातींच्या रोपांचे निःशुल्क वाटप करण्यात आले. अध्यात्म, संस्कार, ज्ञानप्रसार आणि निसर्गसंवर्धन यांची सांगड घालणारा हा उपक्रम उपस्थित भाविकांच्या विशेष पसंतीस उतरला.

हजारो भाविकांच्या सहभागाने सोहळ्याला भव्यता

दशकपूर्तीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या या सामुदायिक जापात पुणे शहरासह विविध भागांतून भाविक सहभागी झाले होते. हजारो भाविकांनी एकत्रितपणे स्तोत्राचा जाप केल्याने बिबवेवाडी जैन स्थानकाचा परिसर भक्तीमय वातावरणाने भारावून गेला. साधू-साध्वीगणांचे मार्गदर्शन, सामुदायिक जाप, आध्यात्मिक साहित्याचे वाटप आणि वृक्षारोपणासाठी रोपांचे वितरण यामुळे या सोहळ्याला धार्मिकतेसोबत सामाजिक बांधिलकीचीही जोड मिळाली.

दहा वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या उपक्रमाने दशकभर सातत्य राखत हजारो भाविकांना एकत्र आणले. श्रद्धा, सामूहिक प्रार्थना, संस्कार आणि सामाजिक जबाबदारी यांचा सुंदर मिलाफ घडवून आणणारा हा दशकपूर्ती सोहळा उपस्थितांच्या स्मरणात राहणारा ठरला.

## माती गणपती मंडळातर्फे आरोग्य दूतांचा सन्मान

■ पुणे (दै. संध्या)

गणेशोत्सव ही केवळ परमेश्वराची पूजा करण्यासाठी नाही. मानवतेची पूजा करण्यासाठी समर्पित व्हावा, या उद्देशाने तब्बल ९२ वर्षांची परंपरा जपणाऱ्या नारायण पेठ माती गणपती मंडळ ट्रस्टने 'सामाजिक गणेश' संकल्पनेंतर्गत सफाई कर्मचारी व आरोग्य दूत यांचा सन्मान केला. याशिवाय महिलांसाठी रंगावली स्पर्धेचे देखील आयोजन करण्यात आले होते.

मंडळाला रमणबाग युवा मंच, श्रीराम पथक व नूमवि वाद्य पथकाची साथ लाभली. वादन फक्त जल्लोषासाठी नाही, तर हे वादन आभार मानण्यासाठी देखील आहे, असा विचार समोर ठेवून ढोल- ताशांचा गजर म्हणजे आरोग्यदूतांच्या मेहनतीला सलाम करण्यात आला.

पाऊस असो, सण असो की सुट्टी सफाई कर्मचारी आणि आरोग्य दूत रस्त्यावर, दवाखान्यात नागरिकांसाठी झटत असतात. कचरा उचलणे, शहर स्वच्छ ठेवणे हे काम सोपे नाही.

हे काम म्हणजे खरी सेवा आहे आणि सेवा हाच खरा धर्म आहे. त्यामुळे सामाजिक गणेश या संकल्पनेंतर्गत हा उपक्रम मंडळातर्फे राबविण्यात आला.

याशिवाय कलात्मक गणेश अंतर्गत महिलांसाठी आयोजित रंगावली स्पर्धेत देखील महिलांनी उत्तमोत्तम रंगावली साकारल्या.



## शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्याचे यश

■ सासवड (दै. संध्या)

दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी शिवाजी व्यायाम मंडळ, सासवड येथे शालेय कुस्ती स्पर्धा – पुरंदर तालुका उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत १७ वर्षे वयोगटात प्रतीक संदीप शिंदे याने उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. प्रतीक हा श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सासवडचा विद्यार्थी आहे. त्याच्या या यशाबद्दल प्राचार्य डॉ. अभिजीत टकले, उपप्राचार्य सौ. सुषमा रासकर मॅडम, क्रीडा शिक्षक श्री. संतोष गलांडे सर तसेच




श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व अधिकारी व पदाधिकारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणे गरजेचे कार्य : विजयराव कोलते

■ पुरंदर : (दै. संध्या)

ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेची कमतरता नाही. त्यांच्या कल्पनाशक्तीला योग्य दिशा देऊन त्यांच्या स्वप्नांना आकार देणे महत्त्वाचे आहे. ज्ञानदानाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये चांगले विचार, राष्ट्रप्रेम, जबाबदारीची जाणीव, संवेदनशीलता आणि समतावादी विचार रुजविण्याचे कार्य शिक्षकांनी करावे, असे प्रतिपादन आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान, पुरंदरचे अध्यक्ष विजयराव कोलते यांनी केले.

आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान, पुरंदर यांच्या वतीने शिक्षण क्षेत्रात प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरावर उल्लेखनीय आणि कार्यक्षम कामगिरी करणाऱ्या शिक्षकांचा विशेष पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

रविवार दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता प्रतिष्ठानच्या सासवड-पिसर्वे रोड येथील सभागृहात हा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. कै. अनुसयाबाई कृष्णाजी जगताप, कै. नारायण कृष्णाजी जगताप, कै. गुणाबाई नारायण जगताप आणि कै. सुमन हनुमंत जाधव, सासवड यांच्या स्मरणार्थ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात प्रा. डॉ. जगदीश दिनकर शेवते (मराठी विभाग प्रमुख, शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरापूर), प्रशांत रमेश जगताप (न्यू इंग्लिश स्कूल, जेऊर), संदीप रामचंद्र



कुंभार (प्राथमिक शाळा, कोंडकेवाडी), सौ. मायादेवी विभीषण जाधव (प्राथमिक शाळा, सिदोबाची वाडी) आणि सौ. संगीता प्रमोद म्हेत्रे (सावित्रीबाई फुले शाळा क्र. २, नगरपालिका सासवड) यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास म.सा.प सासवड शाखेचे अध्यक्ष ॲड. दिलीप निरगुडे, विश्वस्त आण्णासाहेब खाडे, प्रतिष्ठानचे सहसचिव बंडुकाका जगताप, गौरव कोलते, अशफाक बागवान,प्राचार्य संदीप टिळेकर, सौ. शशिकला कोलते, विलास जगताप, सुनील लोणकर, हेमंत ताकवले,विद्या जाधव यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानचे सचिव शांताराम पोमण यांनी केले. त्यांनी प्रतिष्ठानच्या विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेत शिक्षकांच्या समाजातील योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.


## थोडक्यात पण महत्वाचे



## शिवाजीनगर न्यायालयात भव्य मोफत नेत्र तपासणी शिबीर संपन्न

**पुणे : दैनिक संध्या**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे व डिवाईन जैन ग्रुप ट्रस्ट™ यांच्या संयुक्त विद्यमाने आणि एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, पुणे यांच्या सहकार्याने अशोका हॉल, जिल्हा न्यायालय येथे भव्य मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्घाटक म्हणून मा. श्रीमती अंजू एस. शेंडे, (प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे) यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर संपन्न झाले. या शिबिरात न्यायाधीश, कोर्ट पोलीस कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी वर्ग, अधिवक्ता आणि इतर नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. या शिबिरासाठी ३०० हून अधिक लोक उपस्थित होते व सर्वांनी नेत्र तपासणीचा लाभ घेतला. प्रमुख उपस्थिती म्हणून श्री. राजेश शहा, (अध्यक्ष - दि पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन), एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयाचे डॉक्टर्स व व्यवस्थापन, डिवाईन जैन ग्रुप ट्रस्ट™ चे विश्वस्त व सदस्य, तसेच सर्व न्यायाधीश, कोर्ट पोलीस कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी आणि अधिवक्ता मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष निमंत्रक म्हणून मा. श्रीमती रेवती देशपांडे, (सचिव - जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे) आणि श्री. संकेत शहा, (अध्यक्ष - डिवाईन जैन ग्रुप ट्रस्ट™ हे उपस्थित होते) यावेळी मा. शेंडे मॅडम यांनी हा उपक्रम न्यायालयाच्या आवारात आयोजित केल्याबद्दल श्री. राजेश शहा आणि श्री. संकेत शहा यांचे आभार मानले व भविष्यात पुणे येथे अशाच प्रकारचे सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यासाठी शुभेच्छा दिल्या. एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, पुणे, डिवाईन जैन ग्रुप ट्रस्ट™च्या सामाजिक बांधिलकीच्या कार्यातून आरोग्य, शिक्षण आणि समाजोपयोगी क्षेत्रात सातत्याने विविध उपक्रम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविले जात आहेत.



## ‘बाप्पा डॉट ऑर्ग’वर गणेशोत्सवातील पाच वैशिष्ट्यपूर्ण कथांची निवड

**पुणे : दैनिक संध्या**

सांस्कृतिक कार्य विभागाच्या ‘घरोघरी बाप्पा’ उपक्रमांतर्गत महाराष्ट्राचे डिजिटल सांस्कृतिक संग्रह पोर्टल असलेल्या Bappa.org वर आजच्या पाच वैशिष्ट्यपूर्ण गणेशोत्सव कथांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये पुण्यातील नव्या घरातील पहिला गणेशोत्सव, कोकणातील पारंपरिक गौरी-गणपती उत्सव, घरच्या घरी साकारलेली मातीची मूर्ती, व्हिएतनाममधील विद्यार्थ्यांचा उत्सव आणि विसर्जनाच्या मातीतून वृक्षसंवर्धन अशा प्रेरणादायी उपक्रमांचा समावेश आहे. राज्यातील घरे, स्थानिक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, ऐतिहासिक मंदिरे आणि परदेशातील भारतीय समुदायांच्या गणेशोत्सवातील आठवणींचे डिजिटल जतन या उपक्रमातून करण्यात येत आहे. छायाचित्र आणि गणेशोत्सवाशी संबंधित माहिती पोर्टलवर सादर करणाऱ्या प्रत्येक नागरिक, मंडळ अथवा मंदिर न्यासाला महाराष्ट्र शासनाकडून अधिकृत ‘डिजिटल सांस्कृतिक संवर्धक प्रमाणपत्र’ देण्यात येते. वैशिष्ट्यपूर्ण नोंदींची दररोज निवड करून शासनाच्या माध्यमांद्वारे त्यांना प्रसिद्धी देण्यात येत आहे. दरवर्षी गणेशोत्सवासाठी मूळ गावी जाणाऱ्या संजय मंगलाराम यांच्या कुटुंबाने यंदा पुण्यातील नव्या घरात पहिल्यांदाच गणरायाचे स्वागत केले. कुटुंबातील दोन लहान मुलींनी दैनंदिन पूजा आणि आरतीचे नेतृत्व केले. नव्या पिढीकडे परंपरेचा वारसा सोपविणाऱ्या या कौटुंबिक गणेशोत्सवाची निवड झाली आहे. कोकणातील गुहागर परिसरात महिला डोक्यावर पारंपरिक पितळी ताटामध्ये गौरीची मूर्ती, पूजेचे नारळ आणि रानातील तेरड्याचे देठ घेऊन हिरव्यागार भातशेती व गावातील पाणवाटांमधून सामूहिकरित्या मार्गक्रमण करतात. शेती, निसर्ग, स्त्रीशक्ती आणि पूर्वजांच्या परंपरेशी नाते सांगणाऱ्या या शतकानुशतकांच्या प्रथेची निवड करण्यात आली आहे. निकिता जे. पांचाळ यांनी प्लास्टर ऑफ पॅरिसची बाजारातील मूर्ती आणि कृत्रिम रंगांचा वापर टाळला. त्यांनी कच्च्या मातीपासून घरच्या घरी गणेशमूर्ती घडवून स्वतः रंगकाम केले. पारंपरिक मातीकलेचे जतन करत पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देणारा त्यांचा उपक्रम वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. महाराष्ट्रापासून दूर व्हिएतनाममध्ये शिक्षण घेणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन गणेश चतुर्थी साजरी केली.

**APPENDIX 16**
**(Under the bye-law no. 35)**
The Form of Notice, inviting claims or objections to the transfer of the shares and the interest of the Deceased Member in the Capital/Property of the Society.

**NOTICE**

**Shri/Smt. WILSON PASCAL MENEZES** a member of the **GANGA HEIGHTS. Co-operative Housing Society Ltd.,** having address at **PINGALE VASTI, MUNDHWA ROAD** and holding Flat/tenement **No. D7/6** in the building of the society, **died on 12/04/26** without making any valid/undisputed nomination.

The Society hereby invites claims or objections from the heir or heirs or other claimants/objector or objectors to the transfer of the said shares and interest of the deceased member in the capital/property of the Society within a period of **15 days** from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/objections for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the Society. If no claims/objections are received within the period prescribed above, the Society shall be free to deal with the shares and interest of the deceased member in the capital/property of the Society in such manner as is provided under the bye-laws of the Society. The claims/objections, if any, received by the Society for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the Society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the Society. A copy of the registered bye-laws of the Society is available for inspection by the claimants/objectors, in the office of the society/with the Secretary of the **Society between 11.30 A.M to 2.00 P.M.** from the date of publication of the notice till the date of expiry of its period.

For and on behalf of
The GANGA HEIGHTS CO-OP. HSG, SOC, LTD.
Place: Pune,
Date: 18.09.2026

**Hon. Secretary**
**Ganga Heights Co-op. Hsg. Soc.**
**S. No. 77/2/1 & 7/2/2 (Part), Mundhwa Road,**
**Mundhwa, Pune. Mob. 9881464775**

(R.No. 2609190498)

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात कला व सर्जनशील शिक्षणाचे महत्त्व

(दै. संध्या)

■ सुनिल महादेव कटके ■
उपशिक्षक
पुणे महानगरपालिका शाळा नऱ्हे

*“शिक्षण म्हणजे केवळ माहितीचे संकलन नव्हे, तर व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होय.” विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणामध्ये ज्ञानाबरोबरच कल्पनाशक्ती, सर्जनशीलता, संवेदनशीलता आणि कलागुणांना वाव मिळणे आवश्यक आहे. पारंपरिक शिक्षणपद्धतीमध्ये अनेकदा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला अधिक महत्त्व दिले जाते; परंतु प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष गुण, कल्पना आणि सर्जनशील क्षमता दडलेली असते. ही क्षमता ओळखून तिला योग्य दिशा देणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे.*

चित्रकला, हस्तकला, संगीत, नृत्य, नाट्य, कथाकथन, लेखन, वाचन, वक्तृत्व, रांगोळी, हस्ताक्षर, शिल्पकला अशा विविध कलांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. कला विद्यार्थ्यांना स्वतःच्या भावना आणि विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य देते. त्यामुळे कला आणि सर्जनशील शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम आहे.

कला शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांना विविध कलांचा परिचय करून देणे आणि त्यांना स्वतःची कल्पना, भावना व विचार सर्जनशील पद्धतीने व्यक्त करण्याची संधी देणे होय. कला शिक्षणाचा उद्देश प्रत्येक विद्यार्थ्याला कलाकार बनविणे हा नसून त्याच्यातील सर्जनशीलता, निरीक्षणशक्ती, सौंदर्यदृष्टी, आत्मविश्वास आणि अभिव्यक्ती क्षमता विकसित करणे हा आहे. कला विद्यार्थ्यांना नेहमी वेगळ्या पद्धतीने विचार करण्यास प्रेरित करते. चित्र काढताना कोणते रंग वापरायचे, एखादी वस्तू कशी तयार करायची किंवा एखादी कथा कशी मांडायची यासाठी विद्यार्थी स्वतः विचार करतो.

अशा कृतींमुळे विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती वाढते आणि नवीन कल्पना निर्माण करण्याची क्षमता विकसित होते. भविष्यात कोणत्याही क्षेत्रात नावीन्यपूर्ण विचार करण्यासाठी ही क्षमता उपयुक्त ठरते. प्रत्येक विद्यार्थी अभ्यासात सारखीच कामगिरी करेल असे नाही. काही विद्यार्थी चित्रकला, काही संगीत, काही अभिनय, तर काही हस्तकलेमध्ये उत्कृष्ट असतात.

जेव्हा विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात काम करण्याची संधी मिळते आणि त्यांच्या कामाचे कौतुक केले जाते, तेव्हा त्यांचा आत्मविश्वास वाढतो. “माझ्यातही काहीतरी विशेष आहे” ही भावना विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. कला विद्यार्थ्यांना सभोवतालच्या जगाचे बारकाईने निरीक्षण करण्यास शिकवते. चित्र काढताना आकार, रंग, प्रकाश, सावली आणि रचना यांचा विचार करावा लागतो.

निसर्गचित्र काढताना झाडांची रचना, फुलांचे रंग, पक्ष्यांची हालचाल किंवा आकाशातील बदल यांचे निरीक्षण केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांची निरीक्षणशक्ती आणि एकाग्रता वाढण्यास मदत होते.

एखादे चित्र पूर्ण करणे, हस्तकलेची वस्तू तयार करणे, वाद्य शिकणे किंवा नृत्याचा सराव करणे यासाठी संयम आणि सातत्य आवश्यक असते.

कलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एखादे काम पूर्ण होईपर्यंत प्रयत्न करत राहण्याची सवय लागते. त्यामुळे एकाग्रता आणि संयम या गुणांचा विकास होतो.

कला ही आपल्या संस्कृतीचे प्रतिबिंब आहे. लोककला, लोकनृत्य, लोकगीते, पारंपरिक हस्तकला, रांगोळी, वारली चित्रकला आणि विविध सांस्कृतिक परंपरांचा विद्यार्थ्यांना परिचय करून दिल्यास त्यांना आपल्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची जाणीव होते.

विद्यार्थ्यांमध्ये आपल्या संस्कृतीबद्दल अभिमान निर्माण होतो आणि विविध संस्कृतींचा आदर करण्याची वृत्ती विकसित होते.

कला आणि सर्जनशील उपक्रमांचा उपयोग इतर विषय शिकविण्यासाठीही करता येतो. गणितातील आकार चित्रांच्या माध्यमातून समजावून सांगता येतात. विज्ञानातील संकल्पना मॉडेल तयार करून शिकविता येतात. इतिहासातील प्रसंग नाट्यरूपाने सादर करता येतात.

अशा प्रकारे शिक्षण अधिक आनंददायी आणि अनुभवाधारित बनते. विद्यार्थ्यांचा अभ्यासातील सहभाग वाढतो.

सर्जनशील कृती करताना अनेक समस्या निर्माण होतात. एखादी वस्तू तयार करताना साहित्य कमी पडणे, चित्रात चूक होणे किंवा नाटकाच्या सादरीकरणात अडचण येणे अशा परिस्थितीत विद्यार्थी स्वतः उपाय शोधतो.

यामुळे त्याची समस्या सोडविण्याची क्षमता आणि निर्णयक्षमता विकसित होते.

आजच्या डिजिटल युगात माहिती मिळविणे सोपे झाले आहे. परंतु माहिती मिळविण्यापेक्षा तिचा योग्य वापर करून नवीन कल्पना निर्माण करणे अधिक महत्त्वाचे आहे. मोबाईल आणि इंटरनेटचा वापर केवळ मनोरंजनासाठी न करता डिजिटल चित्रकला, शैक्षणिक सादरीकरणे, डिजिटल कथा, शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती अशा सर्जनशील कामांसाठी केला तर विद्यार्थ्यांच्या तंत्रज्ञान कौशल्याबरोबरच सर्जनशीलतेलाही चालना मिळू शकत

कलेतील सहभागाचा उद्देश स्पर्धा जिंकणे नसून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे हा असावा.

विद्यार्थ्यांच्या सर्जनशील विकासात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या कल्पनांना मर्यादा घालण्याऐवजी त्यांना नवीन प्रयोग करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. “हे असेच काढायचे” असे सांगण्याऐवजी विद्यार्थ्याला स्वतःच्या कल्पनेनुसार चित्र काढण्याची संधी दिली तर त्याची सर्जनशीलता वाढते.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या छोट्या प्रयत्नांचेही कौतुक केले पाहिजे. चुकीच्या प्रयत्नांची चेष्टा न करता त्यातून शिकण्याची संधी दिली पाहिजे.

पालकांनी मुलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. प्रत्येक मुलाने केवळ अभ्यासातच चांगले असावे अशी अपेक्षा ठेवण्याऐवजी त्याच्या आवडी आणि क्षमतांचा शोध घेणे महत्त्वाचे आहे.

मुलाला चित्र काढायला आवडत असेल, संगीताची आवड असेल किंवा हस्तकलेमध्ये रस असेल तर त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. पालकांनी मुलांच्या कलाकृतींचे कौतुक करावे आणि त्यांना प्रयोग करण्याचे स्वातंत्र्य द्यावे.

शाळेमध्ये नियमितपणे विविध कला उपक्रम आयोजित करता येतात. चित्रकला, हस्तकला, सुंदर हस्ताक्षर, रांगोळी, कथाकथन, कविता लेखन, नाट्य, गायन, नृत्य, वक्तृत्व आणि विविध प्रकल्प यांचा त्यात समावेश करता येतो.

तसेच शाळेत “कला कोपरा” किंवा “विद्यार्थी सर्जनशीलता भिंत” तयार करून विद्यार्थ्यांच्या कलाकृती प्रदर्शित करता येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या कामाचे कौतुक झाल्याची भावना निर्माण होते. शाळेने आपल्या परिसरातील स्थानिक कलाकार आणि पारंपरिक कलांना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविले पाहिजे. स्थानिक कलाकारांना शाळेत आमंत्रित करून त्यांच्या कलेचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवता येते. यामुळे विद्यार्थ्यांना स्थानिक संस्कृतीची माहिती मिळते आणि पारंपरिक कला जतन करण्याची भावना निर्माण होते.

त्यामुळे कला शिक्षण हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून मूल्यशिक्षणाचेही प्रभावी माध्यम आहे. आजच्या शिक्षणव्यवस्थेत विद्यार्थ्यांना फक्त पाठांतर करणारे बनविण्यापेक्षा प्रश्न विचारणारे, विचार करणारे, प्रयोग करणारे आणि नवीन कल्पना मांडणारे विद्यार्थी घडविणे आवश्यक आहे. सर्जनशील शाळेमध्ये विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य, चुका करण्याची संधी, प्रयोग करण्याची मुभा आणि स्वतःच्या कल्पना व्यक्त करण्याचे व्यासपीठ मिळते.

■ ■ ■

# अनैतिक मानवी व्यापार करणाऱ्या दोघांना अटक

*दोन महिलांची सुटका : येरवडा पोलिसांची कारवाई; खराडी परिसरातून आरोपी ताब्यात*

■ पुणे (दै. संध्या)

अनैतिक मानवी व्यापारासाठी महिलांना प्रवृत्त करून त्यांना ग्राहकांकडे पाठविणाऱ्या दोघांना येरवडा पोलिसांनी अटक केली. या कारवाईत दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. खराडी परिसरातून दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

येरवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनैतिक मानवी व्यापार करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिले होते. त्यानुसार पोलिसांचे पथक परिसरात गस्त घालत असताना पोलीस हवालदार रामेश्वर नवले यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, येरवडा परिसरातील एका हॉटेलमधून ग्राहकांशी दूरध्वनीवर संपर्क साधून महिलांना अनैतिक व्यापारासाठी पाठविले जात आहे. ग्राहकांच्या मागणीनुसार कल्याणीनगर, येरवडा परिसरातील लॉजमध्ये महिलांना पाठवून त्याबदल्यात ठरावीक रक्कम घेतली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

ही माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गिते यांना देण्यात आली. त्यांनी तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर पोलिसांनी माहितीची पडताळणी केली. त्यानंतर बनावट ग्राहकाच्या माध्यमातून संबंधित हॉटेलमध्ये कारवाईचे नियोजन करण्यात आले. पोलिसांनी सापळा रचून छापा टाकला असता अनैतिक व्यापारासाठी प्रवृत्त करण्यात आलेल्या दोन महिलांची सुटका करण्यात आली. सुटका करण्यात आलेल्या महिलांकडे चौकशी केल्यानंतर त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे हा व्यवसाय करवून घेणाऱ्या व्यक्तींचा शोध घेण्यात आला. तपास पथकाने अप्पर खराडी रोड परिसरात सापळा रचून दोन संशयितांना ताब्यात घेतले. त्यांची नावे राज राजेशाम सविता (वय २८, रा. खराडी, पुणे) आणि सुनिल शिवाजी शिंदे (वय ३७, रा. काळेपडळ, हडपसर, पुणे) अशी आहेत. या प्रकरणी १४ सप्टेंबर २०२६ रोजी येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३५०/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमे तसेच अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त चिलुमूला रजनीकांत, सहायक पोलीस आयुक्त सुनील जैतापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गिते, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शारदा कोकाटे, पोलीस निरीक्षक केशव दिंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक शरद देठे, तपास पथकाचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड तसेच पोलीस अंमलदार रामेश्वर नवले, कोकणे, शैलेश वाबळे, गणेश पालवे, सोमनाथ गायकवाड, सागर दळवी, लक्ष्मण ठोकळ, नितीन चांदणे, नागेश कुंजटवाड, प्रशांत कांबळे, साईनाथ म्हस्के, नटराज सुतार, संदिप धादवड आणि महिला पोलीस अंमलदार ज्योती नाईक यांनी ही कारवाई केली.

### गुन्हेगारीविरोधातील कारवाईला प्राधान्य

येरवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनैतिक मानवी व्यापारासह विविध गैरप्रकारांवर कठोर कारवाई करण्यावर भर देण्यात येत आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गिते यांच्या नेतृत्वाखाली तपास पथकाने केलेल्या या कारवाईमुळे अनैतिक व्यापार करणाऱ्यांवर पोलिसांचा वचक निर्माण झाला आहे.




# येरवडा खुल्या कारागृहात बाप्पांचे आगमन



■ पुणे (दै. संध्या)

येरवडा खुले कारागृहात यंदाचा गणेशोत्सव उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येत आहे. कारागृहातील अधिकारी, कर्मचारी आणि बंदीवानांनी एकत्र येत श्री गणेशाची भक्तिभावाने प्रतिष्ठापना केली. कारागृहाच्या सांस्कृतिक भवनात भगवान शंकर आणि कैलास पर्वतावर आधारित आकर्षक रोषणाईसह नयनरम्य देखावा साकारण्यात आला असून, तो सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

गणेशोत्सवानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कारागृहाला भेट देऊन श्री गणरायाचे दर्शन घेतले. १५ सप्टेंबर रोजी विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, पुणेचे अध्यक्ष तथा निवृत्त न्यायाधीश अशोक भिल्लारे यांनी, तर १६ सप्टेंबर रोजी मुख्यालय सदर्न कमांड, पुणे येथील कमांड सायबर ऑपरेशन्स सपोर्ट विंगचे कर्नल आशिष सुतार यांनी उत्सवस्थळी भेट दिली. दोन्ही मान्यवरांनी श्री गणरायाची आरती करून उपस्थित बंदीवानांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. उत्सवाचे विशेष आकर्षण ठरले ते पुण्यातील मोहम्मद रफी म्युझिकल ग्रुपच्या कलाकारांचे सादरीकरण. कलाकारांनी गजाननाची भक्तिगीते सादर करून संपूर्ण वातावरण भक्तिमय केले. या संगीतमय कार्यक्रमाचा बंदीवानांनी मनमुराद आनंद घेतला. संगीताच्या माध्यमातून त्यांना सकारात्मक ऊर्जा आणि उत्साह मिळाला.

महाराष्ट्र राज्याचे महासंचालक (कारागृहे व सुधारसेवा) डॉ. सुहास वारके, विशेष महानिरीक्षक योगेश देसाई आणि पश्चिम विभागाचे कारागृह उपमहानिरीक्षक सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांचे येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांनी रोप देऊन स्वागत केले.यावेळी वरिष्ठ तुरुंग अधिकारी नागेश कांबळे, तुरुंग अधिकारी नागनाथ भाणवसे, निशा श्रेयकर यांच्यासह कारागृहातील अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने बंदीवान उपस्थित होते. गणेशोत्सव आणि संगीतमय कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्व. मोहम्मद रफी फॅन्स क्लबचे गायक मुराद काजी, कविता तरडे-फुगे, देवदत्त राजगुरू, किशोर गायकवाड, ख्वाजा शेख, संदीप काकडे, श्याम पाटील, दिगंबर गरुड, यांनी विशेष योगदान दिले.

# दोन गंभीर गुन्ह्यांत ॲड. अजय मिसार विशेष सरकारी वकील

■ पुणे (दै. संध्या)

नानासाहेब शंकरराव गायकवाड याच्याविरुद्ध दाखल असलेल्या दोन गंभीर गुन्ह्यांमध्ये ॲड. अजय सुहास मिसार यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाने १५ सप्टेंबर २०२६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार चतु:श्रृंगी पोलिस ठाण्यात दाखल FIR क्रमांक ०७७७/२०२३ आणि त्यातून उद्भवलेल्या प्रकरणांमध्ये अतिरिक्त सत्र न्यायाधीश तसेच विशेष मोक्का न्यायालय, पुणे येथे राज्य सरकारची बाजू ॲड. मिसार मांडणार आहेत. याचबरोबर सांगवी पोलिस ठाण्यातील FIR क्रमांक ०३३८/२०२१ या प्रकरणातही त्यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. गुन्हेगाराची आणि गुन्ह्यांची पार्श्वभूमी पाहता या गंभीर प्रकरणात सरकारने विशेष लक्ष घालून पीडितांना न्याय देण्यासाठी केलेली हि नेमणूक विशेष आहे.

FIR क्रमांक ०७७७/२०२३ हे प्रकरण औंध येथील इमारतीच्या भोगवटा प्रमाणपत्राशी संबंधित आहे. पुणे महानगरपालिकेच्या इमारत निरीक्षक कामिनी सुरेश घोलप यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सर्व्हे क्रमांक १२७/१ ए ते १ ई, प्लॉट क्रमांक १०८, औंध येथील मिळकतीसाठी महापालिकेने १५ मार्च २००८ रोजी दिलेल्या पार्ट भोगवटा प्रमाणपत्रानुसार केवळ तळमजल्यावरील शोरूम क्रमांक १ व २ आणि टॉयलेटचा वापर करण्यास परवानगी होती.

फिर्यादीनुसार, संबंधित मिळकत नंतर स्टेट बँक ऑफ इंडियाला १५ वर्षांच्या भाडेकराराने देण्यात आली. या व्यवहारासाठी सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये महापालिकेच्या मूळ भोगवटा प्रमाणपत्रात फेरफार करून पहिल्या मजल्याचा वापर करण्यासही परवानगी असल्याचे दर्शविणारे प्रमाणपत्र जोडण्यात आल्याचा आरोप आहे. या कथित बनावट प्रमाणपत्राचा वापर करून भाडेकरार करण्यात आला आणि पहिल्या मजल्याचा वापर सुरू करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणात नानासाहेब गायकवाड, प्रकाश कुलकर्णी तसेच बनावट प्रमाणपत्र तयार करणाऱ्या अज्ञात व्यक्तींविरुद्ध भारतीय दंड संहितेतील कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब), ३४ तसेच नोंदणी अधिनियमातील कलम ८२, ८३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, FIR क्रमांक ०३३८/२०२१ हे सांगवी पोलिस ठाण्यात २३ ऑगस्ट २०२१ रोजी दाखल झालेले प्रकरण आहे. या गुन्ह्यात शस्त्र अधिनियमातील कलम ३ आणि २५, भारतीय दंड संहितेतील कलम ३९५ तसेच महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम ३९ अंतर्गत गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.या प्रकरणातील फिर्यादी विठ्ठल शिवानंद गुरव यांच्या जबाबानुसार, त्यांनी गॅरेजच्या व्यवसायासाठी नानासाहेब गायकवाड यांच्याकडून ३५ लाख रुपये कर्ज घेतले होते. त्यापैकी १५ लाख रुपये आरटीजीएसद्वारे आणि २० लाख रुपये रोख स्वरूपात घेतल्याचे त्यांनी सांगितले आहे. सुरुवातीला आठ टक्के आणि त्यानंतर पाच टक्के प्रतिमहिना व्याजदराने पैसे देण्याचे ठरल्याचे जबाबात नमूद आहे.

रजि. नं. पी एन ए/जे एन आर/(सी आरं) ४४३/८८-८९ रजि.दि:-६-६-१९८९

।।सहकारातून समृद्धीकडे ।।

# शिवशक्ती नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जुन्नर

**मुख्य कार्यालय :** सदाबाजार/मंगळवारपेठ, जुन्नर. ४१०५०२. (पुणे) ☎ :-( ०२१३२-२९५३६६) शाखा नं. १ :-धान्यबाजार पेठ, जुन्नर ता. जुन्नर फोन नं ०२१३२-२२३११४ शाखा नं. २ :- माणिक चौक, चाकण, ता. खेड, जि. पुणे फोन नं.०२१३५-२४९१०६

जावक क्र. :- ५४/२०२६-२०२७ दिनांक :- १७/०९/२०२६

## जाहीर लिलाव नोटीस

पुणे जिल्ह्यातील सर्व लोकांना कळविण्यात येते की, खालील नागरीकांनी सोनेतारण कर्ज घेतलेले आहे. सदर कर्जाची मुदत संपलेली असून त्यांना त्याबाबत कळविण्यात आले आहे. तरी अद्याप त्यांनी सदर सोनेतारण कर्ज व त्यावरील व्याज भरलेले नाही म्हणुन संस्थेने सोने-तारण कर्जवसुलीसाठी सदर सोन्याचा लिलावाने विक्री करण्याचा ठराव केला आहे. सदर सोने तारण लिलाव **शनिवार दि. २४/१०/२०२६** रोजी **दुपारी १.००** वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात होईल व लिलावाने विकून आलेली रक्कम कर्जदाराचे कर्जात भरली जाईल व कमी पडलेली रक्कम कर्जदाराकडून वसूल केली जाईल. रक्कम शिल्लक राहील्यास कर्जदाराचे बचत खात्यात ठेवण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

| सदाबाजार - मंगळवार पेठ मुख्य शाखा | | |
|---|---|---|
| अ. क्र. | खाते क्र. | नाव |
| जि.ए.चे.नाव : सोनेतारण कर्ज | | |
| १ | २०३२५७९ | रुपेश राजेंद्र जाधव<br>मु. पो. मंगळवार पेठ, जुन्नर, ता जुन्नर, जि. पुणे. जुन्नर. |
| २ | २०३२५८० | रुपेश राजेंद्र जाधव<br>मु. पो. मंगळवार पेठ, जुन्नर, ता जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ३ | २०३२६०८ | सईदा इम्तियाज सय्यद<br>मु. पो. शुक्रवार पेठ, जुन्नर, ता. जुन्नर,जि पुणे जुन्नर. |
| ४ | २०३२७१६ | रंजना राजेंद्र जाधव<br>मु. पो. पणसुंबा पेठ, जुन्नर, ता. जुन्नर जुन्नर. |
| ५ | २०३२७२१ | कविता नवनाथ कोंडे<br>मु. धामणखेल पो. खानापूर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ६ | २०३२७३९ | विलास विठ्ठल वर्पे<br>मु .धामणखेल, पो. खानापूर, जुन्नर |
| ७ | २०३२७५४ | हुसनाबानो अजीम शेख<br>मंगळवार पेठ, जुन्नर, ता. जुन्नर जुन्नर. |
| ८ | २०३२७९३ | जिजाबाई निवृत्ती गवारी<br>मु. बुचकेवाडी, पो. पारुंडे, ता.जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ९ | २०३२८०० | इम्रान अहमदसाहब चौगुले<br>मु.पो. शिपाईमोहल्ला अकबरइमाम वाड्याजवळ, जुन्नर, ता. जुन्नर. |
| १० | २०३२८२५ | मह्वोबी अकबर पीरजादे<br>मु.पो. जुना स्टॅन्ड मागे, शुक्रवार पेठ, जुन्नर, ता जुन्नर जुन्नर. |
| ११ | २०३२८३४ | आस्मा आरिफ शेख<br>माही मोहल्ला रिजवाना हाईट्स जुन्नर जुन्नर |
| १२ | २०३२८४३ | शहाबाज जावेद कुरेशी<br>मु. पो. पणसुंबा पेठ, जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| १३ | २०३२८५१ | प्रशांत सिताराम पारखे<br>निमगाव तर्फे म्हाळुंगे, पो.सावरगाव, ता. जुन्नर, जुन्नर |
| चाकण शाखा | | |
| १४ | ४०३४०३३ | यश रमेश सोनवणे<br>सारा सिटी फ्लॅट नं ६०८ क ९ गट नं १३७ मु. पो. खराबवाडी चाकण ता. खेड |
| १५ | ४०३४२५७ | ज्ञानेश्वर नारायण कोळेकर<br>मु पो कोयाली ता खेड जि पुणे गांवठाण जवळ खेड |
| १६ | ४०३४२६६ | नारायण ज्ञानोबा बगाडे<br>राणुबाई मळा चाकण जि प शाळेजवळ ता खेड |
| १७ | ४०३४२९७ | शरद मारूती रोकडे<br>मु.पो. ठाकुरपिंपरी ता खेड जि पुणे |
| १८ | ४०३४३७० | लक्ष्मण बबन लालगुडे<br>मु पो टाकवे बु. ता. मावळ जि पुणे मावळ |
| १९ | ४०३४४२२ | ज्ञानेश्वर नारायण कोळेकर<br>मु पो कोयाली ता खेड जि पुणे गांवठाण जवळ खेड |
| २० | ४०३४४५९ | अतुल तात्याभाऊ डावरे<br>मु कोरेगाव बु पो किवळे ता खेड जि पुणे खेड |
| २१ | ४०३४४६० | अतुल तात्याभाऊ डावरे<br>मु. कोरेगाव बु पो किवळे ता. खेड जि. पुणे खेड |
| २२ | ४०३४५०७ | रमेश संतोष सोनवणे<br>सारासिटी C/९/६०८ खराबवाडी चाकण ता खेड जि पुणे खेड |
| २३ | ४०३४६२५ | वैभव बालाजी जोगदंड<br>हनुमान वाडी केळगाव आळंदी चाकण |
| २४ | ४०३४७१९ | वैभव बालाजी जोगदंड<br>हनुमान वाडी केळगाव आळंदी चाकण |
| २५ | ४०३४८७६ | विक्रम जयराम इंगळे<br>बोरजाईनगर मेदनकरवाडी चाकण जनाई निवास खेड |
| २६ | ४०३५१७४ | अनिल माधव गंगावणे<br>मु पो भानोबा मंदिरा जवळ कोयाळी ता खेड |
| २७ | ४०३५२३४ | लेख दान<br>साई प्लाझा C-३०२ चक्रेश्वर रोड चाकण ता. खेड जि. पुणे खेड |
| २८ | ४०३५२६० | यश रमेश सोनवणे<br>सारा सिटी फ्लॅट नं ६०८ क ९ गट नं १३७ मु.पो. खराबवाडी चाकण ता. खेड |
| २९ | ४०३५२८५ | संजय धनाजी डोंबाळे<br>मातृ पितृ छाया निवास आंबेठाण चौक मु पो चाकण ता. खेड खेड |
| ३० | ४०३५३५१ | शकिला सरवर शेख<br>CO जॉर्ज रोडड्रीक्स आयफेल सिटी डी १ फ्लॅट नं १०८ खराबवाडी चाकण |
| ३१ | ४०३५५४९ | रविंद्र संजय सावंत<br>हनुमान मंदिराजवळ मु. पो. भोसे ता खेड जि. पुणे खेड |
| ३२ | ४०३५६११ | शेवंताबाई ज्ञानेश्वर कदम<br>खंडोबा मंदिराजवळ जयमल्हार नगर चाकण ता खेड जि पुणे खेड |
| ३३ | ४०३५६२२ | जयश्री योगेश खेडकर<br>बोल्हाई मंदिराजवळ भुजबळ आळी मु.पो. चाकण ता खेड जि. पुणे खेड |
| ३४ | ४०३५६३४ | ज्ञानेश्वर नारायण कोळेकर<br>मु. पो. कोयाली ता खेड जि पुणे गावठाण जवळ खेड |
| ३५ | ४०३५६४७ | काळुराम पिराजी गायकवाड<br>खंडोबामाळ चाकण बलुत आळी चाकण ता. खेड जि. पुणे खेड |
| धान्यबाजार शाखा | | |
| ३६ | ३०३८७०८ | हेमंत चंद्रकांत भुजबळ<br>मु.पो. येणेरे जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ३७ | ३०३९८५५ | वसीम वजीर पटेल<br>मु.पो. बादशहा तलाव जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ३८ | ३०४२९४४ | शबीना इसाक शेख<br>मु. पो. शिपाईमोहल्ला जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ३९ | ३०४२९४५ | लुमा भोरू माळी<br>मु. आंबे, पो. इंगळून जुन्नर |
| ४० | ३०४४१४१ | रामदास देवराम लोहकरे<br>मु. आळू, पो. पिंपळगाव जोगा जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ४१ | ३०४४३७२ | ऋषिकेश कैलास परदेशी<br>मु. पो. शिवबा भोजनालय गॅस गोडाऊन समोर बारव, ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ४२ | ३०४५१६१ | वेदांत सुनील हिवरेकर<br>मु. पो. कुंभार आळी जुन्नर, ता जुन्नर जि पुणे जुन्नर. |
| ४३ | ३०४५३६७ | सुनील शांताराम हिवरेकर मु.पो.कुंभार आळी जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ४४ | ३०४५४४५ | सुनील शांताराम हिवरेकर<br>मु.पो. कुंभार आळी जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ४५ | ३०४५५४० | उज्वला सुनील हिवरेकर<br>मु. पो.कुंभार आळी जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ४६ | ३०४५७७६ | सुनील शांताराम हिवरेकर<br>मु. पो. कुंभार आळी जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर |
| ४७ | ३०४५९१३ | सचिन अशोक मोहिते<br>मु.पो. पाडळी, कबाड वाडी, बुटटेवाडी वाडी जुन्नर जुन्नर. |
| ४८ | ३०४५९२६ | कल्पना शिवाजी ताजणे<br>मु.पो. येणेरे जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ४९ | ३०४६०२१ | स्वाती रमेश माळी<br>मु. पो. कोपरे मांडावे, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ५० | ३०४६३५५ | युवराज रोहिदास भालेराव<br>मु.पो. उच्छिल जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ५१ | ३०४६४२६ | प्रदीप रामचंद्र खरात<br>मु.पो. इंगळूण जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर |
| ५२ | ३०४६४५२ | संदीप नामदेव कोकणे<br>मु.पो.अंजनावळे, तळेचीवाडी जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे.जुन्नर |
| ५३ | ३०४६४५७ | बबन बन्सी डेरे<br>मु. बुचकेवाडी वैष्णव धाम, पो. पारुंडे, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ५४ | ३०४६५०५ | मयूर संतोष केदार<br>मु. तेजुर ठाकरवाडी, पो. आपटाळे जुन्नर. |
| ५५ | ३०४६५४७ | किसन रेवजी जोशी<br>मु. कुकडेश्वर, पो. चावंड जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ५६ | ३०४६५४८ | किसन रेवजी जोशी<br>मु. कुकडेश्वर, पो. चावंड जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर |
| ५७ | ३०४६६३१ | अविनाश सुधाकर सोमोशी<br>मु. शिरोली खु. सोमोशी मळा, पो.शिरोली बु., जुन्नर ता. जुन्नर, जि. जुन्नर. |
| ५८ | ३०४६७९२ | अरुण अनंता कबाडी<br>मु. पो. कबाडवाडी जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ५९ | ३०४६७९३ | अरुण अनंता कबाडी<br>मु.पो. कबाडवाडी जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ६० | ३०४६७९४ | अरुण अनंता कबाडी<br>मु. पो. कबाडवाडी जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे.जुन्नर |
| ६१ | ३०४६८१५ | अहमद इस्माईलमिया शेख<br>मु.पो. महाजन आळी जुन्नर, ता.जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ६२ | ३०४६८३० | मुदस्सेरा मुदस्सरअली सय्यद<br>मु. पो. ब्राह्मण बुधवार पेठ जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ६३ | ३०४६८३२ | अमिना आशक सय्यद<br>मु.पो.सय्यद वाडा जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर |
| ६४ | ३०४६८३३ | अमिना आशक सय्यद<br>मु.पो.सय्यद वाडा जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर |
| ६५ | ३०४६८४८ | फुलाबाई राजेंद्र डाडर<br>मु.पो. लोणार आळी जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे |
| ६६ | ३०४७१२० | प्रफुल्ल लक्ष्मण मेमाणे<br>मु. खिरेश्वर, पो. खुबी जुन्नर, ता.जुन्नर, जि. पुणे |
| ६७ | ३०४७३३० | ताराबाई शांताराम नायकोडी<br>मु. पो. पिंपळगाव सिद्धनाथ विठ्ठलवाडी जुन्नर, ता. जुन्नर. |
| ६८ | ३०४७३९७ | आसमा अब्दुलकादर कुरेशी<br>मु.पो.शिपाई मोहल्ला जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर |
| ६९ | ३०४७४२२ | प्रवीण सुखदेव मंडलिक<br>मु. बेलसर, पो. निरगुडे जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर |
| ७० | ३०४७४६० | अर्जुन मारुती तळपे<br>मु. पो.घंगाळदरे इंगळून जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर |
| ७१ | ३०४७५५९ | नाजमा अशपाक पटेल<br>मु. पो. शिपाई मोहल्ला जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ७२ | ३०४७६०२ | राजु लक्ष्मण भालेराव<br>मु. खांडीची वाडी, पो. निमगिरी जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ७३ | ३०४७७१० | प्रकाश लक्ष्मण खंडागळे<br>मु. पो. पिंपळगाव सिद्धनाथ जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे, |
| ७४ | ३०४७७२६ | दिगंबर मोघा सुपे<br>मु. पो. गोद्रे भोजनेवाडी जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ७५ | ३०४७७३२ | शाम जंगल लांडे<br>मु . हापुस बाग, पो. शिरोली बु. जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ७६ | ३०४७९१३ | सचिन अशोक मोहिते<br>मु. पो. पाडळी कबाडवाडी बुट्टेवाडी जुन्नर. |
| ७७ | ३०४७९१५ | सुनील सोमा गवारी<br>मु. कुकडेश्वर, पो.चावंड जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ७८ | ३०४७९१८ | शबीना इसाक शेख<br>मु. पो. शिपाई मोहल्ला जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ७९ | ३०४७९५४ | सिताराम चंदर रणशूर<br>मु. पो. शिरोली बु., सहकार नगर जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ८० | ३०४७९६८ | रंजना तुकाराम डामसे<br>मु.पो. इंगळून डामसेवाडी जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ८१ | ३०४७९९५ | देवराम शंकर मेमाणे<br>मु. खिरेश्वर, पो. खुबी, ता.जुन्नर, जिल्हा पुणे जुन्नर. |
| ८२ | ३०४८०५४ | ऋषिकेश बाळकृष्ण राजगुरव<br>मु. पो. ब्राह्मण बुधवार पेठ जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ८३ | ३०४८०५५ | ऋषिकेश बाळकृष्ण राजगुरव<br>मु. पो. ब्राह्मण बुधवार पेठ जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ८४ | ३०४८१४६ | चंदू भगवान रेणके<br>मु . पो. पंचलिंग वस्ती जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ८५ | ३०४८१५४ | दिनेश मनोहर देवाडे<br>मु. वाणेवाडी, पो. आपटाळे जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ८६ | ३०४८१५९ | शांताराम सखाराम कोकणे<br>मु. फांगुळगव्हाण, पो. खडकुंबे जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ८७ | ३०४८३३४ | अर्चना संतोष कोकणे<br>मु. पो. गोळेगाव जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ८८ | ३०४८४५२ | शांताराम सखाराम कोकणे<br>मु. फांगुळगव्हाण, पो. खडकुंबे जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ८९ | ३०४८४६० | दत्तात्रय कृष्णा मेमाणे<br>मु. भिवाडे बु., मारुती मंदिर, पो. उच्छिल जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे . |
| ९० | ३०४८४९६ | निवृत्ती भागु शेळकंदे<br>मु. भिवाडे खु., पो. उच्छिल जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे . |
| ९१ | ३०४८५७८ | संदीप नामदेव कोकणे<br>मु. पो. अंजनावळे, तळेचीवाडी जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ९२ | ३०४८६१२ | निलेश लहू सांगडे<br>मु. हडसर, पो. राजुर, ता. जुन्नर, जि. पुणे जुन्नर. |
| ९३ | ३०४८६६३ | अरुण अनंता कबाडी<br>मु. पो. कबाडवाडी जुन्नर ता. जुन्नर जि. पुणे जुन्नर |
| ९४ | ३०४८८३० | बाळु बबन हिले<br>मु पो गोद्रे बांगरवाडी जुन्नर ता जुन्नर जि पुणे जुन्नर |
| ९५ | ३०४८८३२ | विशाल बबन चव्हाण<br>मु पो शिरोली बु सोसायटी जुन्नर ता जुन्नर जि पुणे |
| ९६ | ३०४८८३७ | ईश्वर प्रकाश पवार<br>मु पो महादेवनगर जुन्नर ता जुन्नर जि पुणे जुन्नर |
| ९७ | ३०४८९१७ | योगेश रामभाऊ भवारी<br>हनुमान मंदीराशेजारी तेजूर पो आपटाळे ता जुन्नर |
| ९८ | ३०४८९३३ | कलाबाई कोंडीभाऊ उंबरे<br>मु. पो. कुकडेश्वर पो. चावंड जुन्नर ता जुन्नर जि. पुणे जुन्नर |
| ९९ | ३०४८९३४ | बबन देवराम चव्हाण<br>मु पो शिरोली बु सहकारनगर जुन्नर ता जुन्नर जि पुणे |

सही/-
सौ. कल्पना यंदे
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,
शिवशक्ती नागरी सहकारी पतसंस्था, जुन्नर

## थोडक्यात पण महत्वाचे



### सह्यांनी मेडिकल शॉपचा परवाना स्वतःच्या नावे; दोन डॉक्टरांवर गुन्हा

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी: तळवडे येथील मेडिकल शॉपचा परवाना मिळविण्यासाठी अर्ज आणि संमतिपत्रावर बनावट सह्या करून खोटी कागदपत्रे अन्न व औषध प्रशासनाकडे सादर केल्याचा प्रकार समोर आला आहे. या कागदपत्रांच्या आधारे भागीदारीतील परवाना रद्द करून तो स्वतःच्या नावे घेत शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी दोन डॉक्टरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोशी येथील अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यालयात १२ ऑक्टोबर २०२३ पासून हा प्रकार घडला. डॉ . प्रशांत मधुकर पाटील-कांबळे (वय ३४, रा. नायर कॉलनी, साने चौक, चिखली) आणि डॉ. रविकांत अशोक हडपद-चिंचवडे (वय ३५, रा. चिंचवड रेल्वे स्टेशनजवळ, चिंचवड) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी संजय मोहनसिंग राठोड (वय ५४, रा. मोशी, पुणे) यांनी गुरुवारी (दि. १७) भोसरी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तळवडे येथे 'तळवडे मेडिकल शॉप' नावाने दुकान आहे. या मेडिकलच्या परवान्यासंदर्भात आरोपींनी भागीदारीतील परवाना रद्द करण्यासाठी अर्ज आणि संमतिपत्रावर बनावट सह्या केल्या. ही कागदपत्रे खरी असल्याचे भासवून संबंधित कार्यालयाकडून परवाना रद्द करून तो स्वतःच्या नावे करून घेतला. तसेच, आरोपी रविकांत याने परवाना फॉर्म क्रमांक २० मध्ये परस्पर बदल करून दुसऱ्याचे नाव वगळले. एकाच्याच नावावर परवाना करून भारती एक्सा लाइफच्या चिंचवड शाखेकडून कर्ज घेतल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. या प्रकारातून दोघांनी शासनाची फसवणूक केल्याचा आरोप आहे. भोसरी एमआयडीसी पोलिस तपास करीत आहेत.

### बटण दाबलं की नंबर प्लेटच गायब! पोलिसांसमोर 'मोटराइज्ड' प्लेटचे नवे आव्हान

**पिंपरी : दैनिक संध्या**

काळ्या फिल्म, फॅन्सी नंबर प्लेट आणि वाहनांवरील अनधिकृत 'आमदार' लोगोविरोधात पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी आक्रमक कारवाई सुरू केली आहे; मात्र आता बटण दाबताच वाहनाचा नोंदणी क्रमांक पूर्णपणे झाकणारी 'शटर' अथवा 'मोटराइज्ड' नंबर प्लेट यंत्रणा पोलिसांसमोर नवे आव्हान उभे करीत आहे. ताथवडे येथील एका फॉर्च्युनरमध्ये अशी यंत्रणा आढळून आल्यानंतर हा धोका समोर आला आहे. त्यामुळे अशा यंत्रणांची विक्री आणि फिटिंग करणाऱ्यांवरही लक्ष केंद्रित करण्याची गरज निर्माण झाली आहे. बाहेरून पाहिल्यास ही नंबर प्लेट सामान्य प्लेटप्रमाणे दिसते. मात्र, नोंदणी क्रमांकावर मोटराइज्ड काळे आवरण बसविलेले असते. चालकाकडील बटण किंवा नियंत्रण यंत्रणेच्या मदतीने काही क्षणांत हे आवरण खाली आणून संपूर्ण क्रमांक झाकता येतो. पुन्हा बटण दाबल्यानंतर नंबर प्लेट पूर्ववत होते. केंद्रीय मोटार वाहन नियमांनुसार वाहनाचा नोंदणी क्रमांक पुढील आणि मागील बाजूस स्पष्ट व सहज वाचता येईल, अशा पद्धतीने प्रदर्शित करणे आवश्यक आहे. त्यामुळे क्रमांक लपविणारी अशी यंत्रणा नियमांच्या मूळ उद्देशालाच बाधा आणणारी ठरते. पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर एका फॉर्च्युनरच्या नंबर प्लेटवर काळे आवरण खाली येऊन नोंदणी क्रमांक लपविला जात असल्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला होता. तपासात संबंधित वाहन ताथवडे येथील असल्याचे निष्पन्न झाले. वाहनाच्या नंबर प्लेटजवळ बटणाद्वारे नियंत्रित होणारी यंत्रणा बसविण्यात आली होती. संबंधित वाहनावर ५५ ई-चलने प्रलंबित असून, त्यांची रक्कम सुमारे एक लाख २२ हजार रुपये होती. वाहनात अनधिकृत बदल केल्याप्रकरणी आरटीओने चार हजार ५०० रुपयांची कारवाई केली. त्यानंतर वाकड पोलिसांनी स्वतःहून गुन्हा दाखल करून वाहनमालकाला अटक केली. न्यायालयाने त्याला नंतर जामीन मंजूर केला. अपघात, हिट अँड रन, अपहरण, खून, चेन स्नॅचिंग, मोबाइल हिसकावणे अशा गुन्ह्यांमध्ये वाहनाचा नोंदणी क्रमांक हा पोलिसांसाठी महत्त्वाचा दुवा असतो. सीसीटीव्ही फुटेजमधून क्रमांक मिळाल्यानंतर आरटीओ नोंदीच्या आधारे वाहनमालकाचा माग काढता येतो.

### गणेशोत्सवात मेट्रोला पुणेकरांची पसंती; २.६२ लाख प्रवाशांचा प्रवास

**पिंपरी : दैनिक संध्या**

गणेशोत्सवाच्या पहिल्या दिवशी (१४ सप्टेंबर) पुणे-पिंपरी-चिंचवडकरांनी प्रवासासाठी मेट्रोला पसंती दिली असून, २ लाख ६२ हजार ६७१ जणांनी मेट्रोतून प्रवास केला. गतवर्षी बाप्पाच्या स्थापनेच्या दिवशी २ लाख १६ हजार ३७४ प्रवाशांनी प्रवास केला होता. त्याच्या तुलनेत यंदा ४६ हजार २९७ सुमारे म्हणजेच सुमारे २१.४० टक्के वाढ नोंदविण्यात आली. गणेशोत्सवात दर पाच मिनिटांनी मेट्रो धावत आहे. गणेशोत्सवात पिंपरी-चिंचवड परिसरातून पुण्यातील मानाचे गणपतींच्या दर्शनासाठी तसेच विविध ठिकाणचे देखावे पाहण्यासाठी नागरिक गर्दी करतात. यंदा गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी मेट्रोच्या मुख्य स्थानकांचा मोठ्या प्रमाणावर वापर झाल्याचे प्रवासी संख्येवरुन दिसून येत आहे. महात्मा फुल मंडई स्थानकावर सर्वाधिक ५१ हजार ५३३ प्रवाशांची नोंद झाली आहे. जिल्हा न्यायालय स्थानकावर इंटरचेंज करणाऱ्या प्रवाशांची संख्या ५८ हजार ९४८ होती. गतवर्षीच्या तुलनेत या स्थानकांवरील इंटरचेंज प्रवाशांत २१.८९ टक्के वाढ झाली आहे. पीसीएमसी स्थानकावर २५ हजार ४२९, रामवाडी स्थानकात २३ हजार ६४४, स्वारगेट स्थानकात २१ हजार ९९ आणि पीसीएमसी स्थानकात मेट्रो स्थानकात १९ हजार २६७ प्रवशांची नोंद झाली आहे. गणेशोत्सवातील गर्दी लक्षात घेऊन मेट्रो प्रशासनातर्फे सेवेत बदल करण्यात आला असून, आता सेवा रात्री दोनपर्यंत सुरू राहणार आहे.

### २९ बांगलादेशी नागरिकांचा शोध; २६ जणांना मायदेशी पाठविले

**पिंपरी : दैनिक संध्या**

शहरात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांचा माग काढण्यात पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या दहशतवाद विरोधी शाखेला (एटीबी) यश आले आहे. मे २०२५ पासून राबविण्यात आलेल्या शोधमोहिमेत पोलिसांनी २९ बांगलादेशी नागरिकांचा शोध घेतला असून, त्यातील २६ जणांना त्यांच्या मायदेशी पाठविण्यात आले आहे. उर्वरित तिघांच्या डिपोर्टेशनची प्रक्रिया सुरू आहे. विशेष शाखेचे पोलिस उपायुक्त धीरज पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरात बेकायदा राहणाऱ्या परदेशी नागरिकांचा शोध घेण्यासाठी 'एटीबी'कडून सातत्याने स्थानिक स्तरावर माहिती संकलित केली जात आहे. संशयितांच्या वास्तव्याची खातरजमा, कागदपत्रांची पडताळणी आणि चौकशी करून त्यांची खरी ओळख निश्चित केली जात आहे. त्यासाठी संशयितांनी दिलेली वैयक्तिक माहिती, वास्तव्याचा तपशील आणि उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी करण्यावर पोलिसांचा भर आहे. बेकायदा वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिकांकडून वेगळी नावे सांगणे किंवा बनावट कागदपत्रांचा वापर केला जात असल्यास त्यांची खरी ओळख निश्चित करणे पोलिसांसाठी आव्हानात्मक ठरते.




# पिंपळे सौदागरचा 'ईझी पेडल' सायकल प्रकल्प सुसाट नाही; ३,५०० नोंदणी, रोज फक्त २० ते ३० वापरकर्ते

**■ पिंपरी : (दै. संध्या)**

शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्याबरोबर पर्यावरणपूरक प्रवासाला चालना देण्यासाठी पिंपळे सौदागर परिसरात पालिकेकडून सुरू करण्यात आलेल्या 'ईझी पेडल' सायकल प्रकल्पाला अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र आहे. लाखो रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या या प्रकल्पातील सायकली उपलब्ध असतानाही नागरिकांकडून त्याचा वापर मर्यादित प्रमाणात होत आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या उद्देशाबरोबरच त्याच्या नियोजनावरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

पिंपळे सौदागर परिसरात प्रायोगिक तत्त्वावर हा प्रकल्प सुरू करण्यात आला. या ठिकाणी सायकल स्टेशन उभारून नागरिकांना सायकल भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

मात्र, सायकल घेण्यासाठी मोबाइल ॲपवर नोंदणी, पेमेंट आणि अन्य प्रक्रिया करावी लागत असल्याने अनेक नागरिक या सुविधेपासून दूर राहत असल्याचे दिसून येते. प्रकल्पासाठी आतापर्यंत सुमारे ३ हजार ५०० नोंदणी झाल्याची माहिती आहे. मात्र, प्रत्यक्षात दररोज सायकल वापरणाऱ्यांची संख्या २० ते ३० च्या आसपास असल्याचे समोर येते. त्यामुळे नोंदणीचा आकडा आणि प्रत्यक्ष वापर यामध्ये मोठी तफावत दिसून येत आहे. प्रकल्पात ५०हून अधिक सायकली, तसेच १० इलेक्ट्रिक सायकल/बाईक उपलब्ध आहेत. ॲपच्या माध्यमातून ऑनलाइन अनलॉकिंग, जीपीएस फेन्सिंग आणि रिअल टाइम ट्रॅकिंगसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. मात्र, तंत्रज्ञानाची सुविधा उपलब्ध करून देणे आणि ती नागरिकांना सहज वापरता येणे, यामध्ये मोठी दरी निर्माण झाल्याचे चित्र आहे. सायकल स्टेशनवर उपलब्ध असलेल्या सायकली नागरिकांच्या नजरेस पडतात. मात्र, त्या प्रत्यक्षात कशा वापरायच्या, ॲपवरून नोंदणी कशी करायची, सायकल अनलॉक कशी करायची आणि शुल्क कसे आकारले जाते, याबाबत पुरेशी माहिती अनेक नागरिकांना नसल्याचे दिसून येते. स्टेशनवर माहिती फलक, मार्गदर्शक सूचना आणि प्रत्यक्ष मदत उपलब्ध करून दिल्यास नागरिकांचा सहभाग वाढू शकतो. केवळ ॲपच्या माध्यमातून सेवा देण्याऐवजी सुरुवातीच्या टप्प्यात नागरिकांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे. पावसाळ्यात सायकल वापरावर परिणाम होणे स्वाभाविक असले तरी पावसाळा संपल्यानंतरही प्रकल्पाला अपेक्षित गती मिळाली नाही, तर त्याचा फेरविचार करण्याची वेळ येऊ शकते. शहरात सायकल संस्कृती विकसित करण्यासाठी केवळ सायकल स्टेशन उभारणे पुरेसे नसून त्याचा नियमित वापर वाढविण्यासाठी व्यापक जनजागृती करणे आवश्यक आहे.

## पुणे जिल्ह्यात घरगुती गौरी-गणपती सजावट स्पर्धेचे आयोजन; २८ सप्टेंबरपर्यंत नोंदणी

**■ पिंपरी(दै. संध्या)**

अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने पुणे जिल्ह्यातील कुटुंबांसाठी 'घरगुती गौरी-गणपती सजावट स्पर्धा २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. संस्कृती, इतिहास, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक संदेश या विषयांवर आधारित ही स्पर्धा घेण्यात येणार असून, गणेशोत्सवाच्या माध्यमातून सकारात्मक सामाजिक संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश आहे.

महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती, छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास, पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व आणि सामाजिक बांधिलकी यांचे दर्शन घरगुती सजावटीतून घडविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. पुणे जिल्ह्यातील घरगुती गौरी-गणपती सजावट करणाऱ्या सर्व कुटुंबांना या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सजावटीचे दोन छायाचित्रे आणि १ ते २ मिनिटांचा व्हिडिओ नाव, जिल्हा आणि संपर्क क्रमांकासह व्हॉट्सॲपद्वारे आयोजकांकडे पाठवावा लागणार आहे. नोंदणीची अंतिम तारीख २८ सप्टेंबर २०२६ निश्चित करण्यात आली आहे.



आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, स्पर्धेसाठी पात्र ठरलेले व्हिडिओ अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशनच्या फेसबुक पेजवर प्रसिद्ध केले जातील. एका लाईकला १ गुण आणि एका वैध कमेंटला २ गुण देण्यात येणार आहेत.

एका फेसबुक खात्याकडून एका व्हिडिओवर केलेली एकच कमेंट ग्राह्य धरण्यात येईल. तसेच फेक, पेड किंवा कृत्रिम एंगेजमेंट आढळल्यास संबंधित सहभागाबाबत अंतिम निर्णय आयोजकांकडून घेतला जाईल. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी सजावटीमध्ये प्लास्टिक आणि थर्माकोलचा वापर टाळून नैसर्गिक व पर्यावरणस्नेही साहित्याचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी राहुल पवार (८१८०९१३३५५), संदीप निकम (९७६७२३२५२७), अमर भोसले (९८५०५१३१२३), अमोल भोसले (८३९०५५५५५८), कैलास बाकले (९५९५३५४५२३), अभिजीत जाधव (९८८१३५८२३६) आणि सुभाष पाटील (९५५२७४७३००) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## महासभेतील 'त्या' बेकायदेशीर उपसूचनेची अंमलबजावणी रोखा

**■ पिंपरी(दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या महासभेत २० एप्रिल २०२६ रोजी मंजूर झालेल्या विषय क्रमांक १०, ठराव क्रमांक १९ मधील उपसूचना बेकायदेशीर असून तिची अंमलबजावणी तात्काळ रोखावी, अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते तथा माजी नगरसेवक विनोद नढे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ४५१ अन्वये सदर ठराव स्थगित अथवा रद्द करण्याची मागणीही त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

विनोद नढे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महासभेतील मूळ विषय हा सुरक्षा विभागातील रखवालदार अभिषेक फुगे यांना राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा कामगिरीच्या आधारे विशेष पदोन्नती देण्यासंदर्भातील होता. मात्र, या विषयावर मांडलेल्या उपसूचनेद्वारे स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील कार्यकारी अभियंता, उपअभियंता, सहशहर अभियंता पदांच्या पदोन्नत्या तसेच सेवाप्रवेश नियमांमध्ये बदल करण्यासंदर्भातील बाबी समाविष्ट करण्यात आल्या. हे विषय मूळ विषयाशी संबंधित नसून सभा कामकाज नियमांचे उल्लंघन असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

राज्य शासनाने ४ जुलै २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदासाठी ७५ टक्के नामनिर्देशन व २५ टक्के पदोन्नतीचे प्रमाण निश्चित केले असताना, महासभेने ठरावाद्वारे हे प्रमाण बदलून २५ टक्के नामनिर्देशन व ७५ टक्के पदोन्नती असे निश्चित करण्याचा प्रयत्न केल्याचे नढे यांनी नमूद केले आहे. सेवाप्रवेश नियमांमध्ये बदल करण्याचा अधिकार राज्य शासनाचा असून, महानगरपालिकेला तो अधिकार नसल्याचा दावा त्यांनी केला आहे. तसेच शासनाची अंतिम मान्यता मिळण्यापूर्वीच पदोन्नती प्रक्रिया राबविण्याचा आणि काही कर्मचाऱ्यांना तदर्थ पदोन्नती देण्याचा उल्लेख ठरावात करण्यात आल्याने ही बाब पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. महापालिका आयुक्तांना असलेले अर्हता तपासणी, विभागीय पदोन्नती समितीची बैठक, सेवाज्येष्ठता यादीची पडताळणी व पदस्थापना यांसारखे प्रशासकीय अधिकार महासभेच्या ठरावाद्वारे बाधित होत असल्याचेही विनोद नढे यांनी निवेदनात म्हटले आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर अभियांत्रिकी विभागाच्या पदोन्नती व सेवाप्रवेश नियमांशी संबंधित उपसूचनेची कोणतीही अंमलबजावणी महापालिका प्रशासनाने करू नये.

# सार्वजनिक शौचालयाच्या प्रश्नावर ज्येष्ठ नागरिकांचा मूक निषेध

**■ पिंपळे सौदागर (दै. संध्या)**

पिंपळे सौदागरच्या कुंजीर चौक येथील राजमाता जिजाऊ उद्यानाशेजारी (वर्ल्ड पार्क परिसर) असलेले सार्वजनिक शौचालय गेल्या दोन वर्षांपासून बंद असल्याने नागरिक आणि विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांनी आज (दि.१८) मूक निषेध आंदोलन केले.



परिसरातील नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सार्वजनिक वापरासाठी उभारण्यात आलेले हे शौचालय दीर्घकाळापासून बंद असून त्याच्या परिसरात कचऱ्याचे ढीग साचले आहेत. त्यामुळे अस्वच्छता वाढली असून नागरिकांना मूलभूत सुविधेपासून वंचित राहावे लागत आहे. तसेच शौचालयाच्या इमारतीतील काही गाळ्यांचा अनधिकृत वापर होत असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. ई-सेवा केंद्रासाठी असलेल्या गाळ्यात पंचर काढण्याचा व्यवसाय सुरू असल्याचे निदर्शनास आल्याचे नागरिकांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका डॉ. सौ. कुंदाताई संजय भिसे आणि उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. यावेळी संबंधित ठेकेदार सुबोध ठाकूर यांच्याकडे शौचालय बंद असण्याबाबत जाब विचारण्यात आला.

शौचालय सुरू न होण्यामागे कधी पाण्याची तर कधी वीजपुरवठ्याची अडचण असल्याची कारणे दिली जात असल्याचे नागरिकांनी सांगितले. मात्र, नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. प्रशासनाच्या दुर्लक्षाविरोधात ज्येष्ठ नागरिकांनी तोंडावर हात ठेवून मूक निषेध नोंदवला. तसेच हे शौचालय तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली. पुढील दोन दिवसांत शौचालय नागरिकांच्या सेवेत सुरू न झाल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही ज्येष्ठ नागरिकांनी दिला.

## थोडक्यात पण महत्वाचे




### शरदचंद्र नागरी सहकारी पतसंस्थे'कडून सभासदांना लाभांशासह दिवाळीची भेट

**नारायणगाव: दैनिक संध्या**

राजुरी येथील शरदचंद्र नागरी सहकारी पतसंस्थेची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या सभेत पतसंस्थेच्या वतीने चालू वर्षासाठी सभासदांना ११ टक्के लाभांश देण्याची घोषणा करण्यात आली. लाभांशासोबतच सर्व सभासदांना दीपावली भेटवस्तू देखील देण्यात येणार असल्याची माहिती पतसंस्थेचे अध्यक्ष एम. डी. घंगाळे यांनी दिली. तसेच, दरवर्षीप्रमाणे यंदाही सर्व सभासद, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा ३ लाख रुपयांचा अपघाती विमा उतरवला जाणार आहे.संस्थेचे अध्यक्ष घंगाळे यांनी पतसंस्थेच्या प्रगतीचा आढावा घेताना सांगितले की, १९९२ मध्ये स्थापन झालेल्या शरदचंद्र पतसंस्थेचे मुख्याकार्यालयासह राज्यभरात १७ शाखा कार्यरत आहेत. सध्या पतसंस्थेमध्ये १९,११९ सभासद आहेत.पतसंस्थेची आर्थिक स्थितीमध्ये खेळते भागभांडवल ४१७ कोटी रुपये असून वसूल भागभांडवल १९ कोटी रुपये इतके आहे. संस्थेमध्ये अहवाल वर्षात ३४० कोटी रुपयांच्या ठेवी असून कर्जवाटप २६५ कोटी रुपये इतके झाले आहे. पतसंस्थेला अहवाल वर्षात ३ कोटी ७५ लाख 30 हजार २८८ रुपयांचा नफा झाला आहे. संस्थेला सातत्याने 'अ' वर्ग मिळत आहे. ही वार्षिक सभा अध्यक्ष एम. डी. घंगाळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी व्यासपीठावर उपाध्यक्ष राजेंद्र औटी, मानद सचिव दत्तात्रेय गंधट, खजिनदार भीमाजी मालुस्कर ,संस्थापक व संचालक जी. के. औटी, तुळशीराम हाडवळे, प्रमोद पा. औटी ,संजय पिंगळे, शालिनी हाडवळे, वैशाली औटी, मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास घंगाळे, अशोकराव औटी ,विवेक शेळके, संदीप औटी,शांता गवळी, तज्ज्ञ संचालक अशोक कणसे, संतोष चव्हाण, अ. रज्जाक सय्यद, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विजय गाडगे आदी उपस्थित होते. यांच्यासह जुन्नर पंचायत समितीचे माजी सभापती दीपक औटी, ग्राहक पंचायतीचे बाळासाहेब औटी, राजुरीच्या सरपंच प्रिया हाडवळे, उपसरपंच माउली शेळके, वल्लभ शेळके आदी मान्यवर उपस्थित होते. सभेचे प्रास्ताविक जी. के. औटी यांनी केले, तर विषय पत्रिकेचे वाचन मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास घंगाळे यांनी केले. तुळशीराम हाडवळे यांनी सूत्रसंचालन केले आणि शेवटी अनंतराव गटकळ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### किशोर राजे निंबाळकर यांची रयत शिक्षण संस्थेच्या सचिवपदी निवड




**शिरूर : दैनिक संध्या**

शिरूरचे सुपुत्र, माजी सनदी अधिकारी तथा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष किशोर राजे दत्तात्रय निंबाळकर यांची प्रतिष्ठित रयत शिक्षण संस्थेच्या सचिवपदी निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीमुळे शिरूरच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. प्रशासकीय सेवेत प्रदीर्घ अनुभव, शैक्षणिक क्षेत्राची जाण आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम असलेल्या निंबाळकर यांच्या निवडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. किशोर राजे निंबाळकर यांनी प्रशासकीय सेवेत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली असून, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव, जळगावचे जिल्हाधिकारी यांसह महसूल व प्रशासन क्षेत्रातील विविध महत्त्वाच्या पदांवर त्यांनी काम केले आहे. अक्कलकोटचे तहसीलदार म्हणून १९८७ मध्ये त्यांनी प्रशासकीय सेवेला सुरुवात केली. त्यानंतर सोलापूर व पंढरपूरचे प्रांताधिकारी, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच मंत्र्यांचे सचिव म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे. प्रशासकीय क्षेत्रातील या प्रदीर्घ अनुभवासोबतच निंबाळकर यांचा शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांमध्येही सहभाग राहिला आहे. शिरूरमध्ये सनशाईन सॅटर्डे क्लबचे संस्थापक अध्यक्ष म्हणून ते कार्यरत आहेत. विविध क्षेत्रांतील मान्यवरांना एकत्र आणून ज्ञान, साहित्य, कला, सामाजिक बांधिलकी आणि वैचारिक देवाणघेवाणीला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कार्य या उपक्रमाच्या माध्यमातून सुरू आहे. रयत शिक्षण संस्थेच्या सचिवपदाची नवी जबाबदारी स्वीकारताना किशोर राजे दत्तात्रय निंबाळकर यांच्या प्रशासकीय अनुभवाचा, व्यापक कार्याचा आणि शैक्षणिक दृष्टिकोनाचा संस्थेच्या पुढील वाटचालीस लाभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शिरूरच्या भूमिपुत्राची प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थेच्या सचिवपदी झालेली निवड ही शिरूरच्या दृष्टीने अभिमानाची बाब मानली जात आहे.



### वाडेबोल्हाई येथे भव्य इनडोअर स्टेडियम उभारणार : आमदार पठारे यांची ग्वाही

**कोरेगावमुळ: दैनिक संध्या**

उत्तम आरोग्यासाठी नियमित व्यायामासह कुस्ती, मैदानी खेळ, योगासने आणि प्राणायाम यांचा अवलंब करण्याचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. तसेच जोगेश्वरी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वाडेबोल्हाई येथे आयुक्तांची विशेष परवानगी घेऊन भव्य इनडोअर स्टेडियम उभारण्याची आणि पूर्व हवेली परिसरातून गुणवंत खेळाडू घडविण्यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही त्यांनी दिली.उद्घाटनप्रसंगी आमदार पठारे यांनी जीवनातील आरोग्याचे महत्त्व विशद केले. वाडेबोल्हाई(ता. हवेली) येथे क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे जिल्हा क्रीडा परिषद;जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे आणि जोगेश्वरी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वाडेबोल्हाई यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन १७ सप्टेंबर २०२६ रोजी विद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार बापूसाहेब पठारे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी विद्यालयाच्या शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कुशाभाऊ गावडे, शाळा समितीचे अध्यक्ष विद्याधर गावडे, सामाजिक कार्यकर्ते लाला गावडे, नानासाहेब पायगुडे, ग्रामपंचायत सदस्य सुमित शिंदे, पी.टी.पठारे महाविद्यालयाचे माजी प्राचार्य मोडक यांच्यासह अनेक मान्यवर, ग्रामस्थ उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कुस्तीचे आश्रयदाते आणि जीवनगौरव पुरस्कारप्राप्त दिवंगत पंढरीनाथ (आण्णासाहेब) पठारे यांच्या स्मरणार्थ ही स्पर्धा विद्यालयात आयोजित करण्यात आली.

# चाकणला गौराईंची आरास पाहण्यासाठी महिलांची उडाली झुंबड

■ चाकण (दै. संध्या)

लेक वाचवा, पर्यावरण वाचवा व पाणी बचतीचा सामाजिक संदेश देत चाकण पंचक्रोशीत घराघरांत चैतन्यमय वातावरणात सोनपावलांनी आलेल्या गौराईंची सजावट व आरास पाहण्यासाठी चाकण येथे महिला व तरुणींची रात्री उशिरापर्यंत झुंबड उडाली होती.

लक्ष्मीच्या रूपाने आलेल्या या माहेरवाशीणीच्या स्वागताची तयारी महिला व तरुणी गेल्या अनेक दिवसांपासून करत असल्याचे रागिनी गोसावी, रेश्मा गोसावी, माधुरी गोसावी, मोनिका गोसावी यांनी सांगितले. लाडू, करंज्या, चकल्या, अनारसे आदी पंचपक्वान्न त्याचबरोबर गौरींच्या सजावटीसाठी साड्या, दागदागिने आदी गोष्टींची जय्यत तयारी करण्यात आली होती. गौराईंना भर भक्कमपणे सजवण्यात आले होते.

घरातील महिलावर्ग एकत्रित येऊन सजावटीत व्यस्त झाला होता. कोणी तळ्यावरील खड्यांना गौरीच्या रूपात घरी आणले होते. तर कोणी पान फुलांच्या रूपाने गौरीला घरी आणले होते. काही ठिकाणी मुखवट्याच्या गौरीही विराजमान झाल्या होत्या. येथील रेश्मा गोसावी व माधुरी गोसावी यांनी गौराईला केलेल्या आरासच्या माध्यमातून दुष्काळ मानवनिर्मित की निसर्गनिर्मित यावर समाज प्रबोधन करून लेक वाचवा, पाणी वाचवा व पर्यावरण वाचवा असा समाजाला संदेश दिला.



## आळंदीत काशी विश्वनाथ मंदिर, श्री नवनाथ दर्शन देखाव्यांना गर्दी

■ आळंदी (दै. संध्या)

गणेशोत्सवानिमित्त आळंदी शहरातील विविध गणेश मंडळांनी धार्मिक व सांस्कृतिक देखावे साकारले असून, त्यांना नागरिक व भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पीएमपीएमएल बसस्थानकाजवळ जय गणेश ग्रुपच्या वतीने साकारण्यात आलेली काशी विश्वनाथ बाबा मंदिराची प्रतिकृती, तसेच आवारी हॉस्पिटलजवळ जय गणेश प्रतिष्ठानच्या वतीने सादर करण्यात आलेला 'श्री नवनाथ दर्शन' देखावा नागरिकांचे विशेष आकर्षण ठरत आहे.

जय गणेश ग्रुपच्या वतीने काशी विश्वनाथ बाबा मंदिराची भव्य प्रतिकृती उभारण्यात आली आहे. आकर्षक मंदिररचना, विद्युत रोषणाई आणि भक्तिमय वातावरणामुळे हा देखावा पाहण्यासाठी सायंकाळच्या वेळेत नागरिक व गणेशभक्तांची मोठी गर्दी होत आहे. जय गणेश ग्रुपचे अध्यक्ष नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा देखावा साकारण्यात आला आहे. दरम्यान, जय गणेश प्रतिष्ठानच्या वतीने 'श्री नवनाथ दर्शन' हा धार्मिक देखावा




उभारण्यात आला आहे. नवनाथांच्या विविध रूपांचे दर्शन एकाच ठिकाणी घडावे, या उद्देशाने देखाव्याची आकर्षक मांडणी करण्यात आली आहे. प्रकाशयोजना व भक्तिमय वातावरणामुळे या देखाव्यालाही भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जय गणेश प्रतिष्ठानचे अध्यक्ष सागर उर्फ गोविंद कुऱ्हाडे यांच्या पुढाकारातून हा देखावा साकारण्यात आला आहे. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे म्हणाले, "धार्मिक व सांस्कृतिक परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचावी आणि नागरिकांना भक्तिमय अनुभव मिळावा, या उद्देशाने काशी विश्वनाथ बाबा मंदिराची प्रतिकृती साकारण्यात आली आहे."

## खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व स्पर्धात्मक वृत्ती निर्माण होते, खेळाचे शिक्षण क्षेत्रात महत्त्वाचे स्थान

■ कवठे येमाई (दै. संध्या)

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांचा शारीरिक व मानसिक विकास ही महत्त्वाचा असून, खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त, एकाग्रता, सहनशक्ती आणि स्पर्धात्मक वृत्ती निर्माण होते. याच उद्देशाने रामलिंग महिला उन्नती बहुउद्देशीय सामाजिक संस्था, रामलिंग व स्व. गणेश गौतम घावटे पाटील यांच्या वतीने सौ. राणीताई कर्डिले यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रामलिंग शिरूर येथे धावणे स्पर्धा संपन्न झाल्या.

इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. खिलाडूवृत्तीने स्पर्धेचा आनंद घेत विद्यार्थ्यांनी आपल्या धावण्याच्या कौशल्याचे दर्शन घडविले. धावण्या सारख्या खेळांमुळे शरीराची ताकद व सहनशक्ती वाढवण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि जिद्द निर्माण होते. त्यामुळे शिक्षणासोबत खेळालाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे,




असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

प्रत्येक वर्गातील प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. बक्षीस वितरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. सौ. राणीताई कर्डिले या आपल्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. जिल्हा परिषद शाळांमध्ये शिकणारी मुले आर्थिकदृष्ट्या सामान्य परिस्थितीतून येत असली तरी त्यांच्यात गुणवत्ता व प्रतिभा मोठ्या प्रमाणात असते. अशा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व प्रेरणा देण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढाकार घेण्याची गरज असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

यावेळी पंचायत समिती सभापती सौ. स्वातीवहिनी घावटे, ग्रामसदस्य केशवदादा शिंदे, डॉ. वैशाली साखरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष निलेश लोंढे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले तसेच सौ. राणीताई कर्डिले यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमास ग्रामसदस्य लताताई इसवे, शिरूर शहर राष्ट्रवादी युवती अध्यक्ष श्रुतिका झांबरे, राष्ट्रवादी उपाध्यक्ष शीतल शर्मा, आशा वर्कर बोराडे ताई, रामदास कर्डिले, ललिता साबळे, मुख्याध्यापिका सुनीता जगताप, मांजरे मॅडम, लाळगे मॅडम, वाबळे मॅडम, जगदाळे सर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## खंडोबा बानुबाई विवाह सोहळ्याने चाकण नगरी दुमदुमली

■ चाकण (दै. संध्या)

शताब्दी वर्षात यशस्वीपणे पदार्पण केलेल्या व चाकण पंचक्रोशीत सामाजिक उपक्रमात आघाडीवर असलेल्या येथील समस्त बालवीर मंडळाच्या यंदाच्या खंडोबा बानुबाई विवाह सोहळा या जिवंत देखाव्याने चाकण नगरी दुमदुमली आहे.

गणेश भक्तांना आणि चाकणकर नागरिकांना दिशा आणि प्रेरणा देणारे गणेश मंडळ म्हणून चाकण येथील श्री समस्त बालवीर मंडळाचा आवर्जून नामोउल्लेख केला जातो. जनता शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष व समस्त बालवीर मंडळाचे अध्यक्ष तसेच आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते संजय वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली हे मंडळ समाजाला विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्रबोधन करत आहे. श्री समस्त बालवीर मंडळ शतक महोत्सव वर्षासाठी चांगली आर्थिक तरतूद व्हावी म्हणून मंडळाच्या कार्यकर्त्यांनी गणपती मूर्ती विक्रीतून प्रत्येक वर्षी शिल्लक राहणारी रक्कम बाजूला ठेवत गेले.

उद्योजक संजय परदेशी व रमेश वाडेकर तसेच इतर कार्यकर्त्यांच्या नियोजनातून मंडळाला आज शतक महोत्सवासाठी भरीव रक्कम उपयोगी पडत असल्याचे संजय वाडेकर यांनी सांगितले. समस्त



बालवीर मंडळांनी ९९ व्या वर्षी शिवपार्वती विवाह सोहळा हा ३५ कलाकारांच्या संचात भव्य दिव्य देखावा सादर करून मंडळांने देखाव्याच्या परंपरेत मानाचा तुरा रोवला. शिवपार्वती विवाह सोहळा या जिवंत देखाव्याचे संपूर्ण चाकण पंचक्रोशीतून आजही तुफान कौतुक होत आहे. वेळ, श्रम व साधनांचा काटेकोरपणे उपयोग करून मंडळाने यंदा गणेश भक्तांच्या आवडीचा खंडोबा बानुबाई विवाह सोहळा हा जिवंत देखावा सादर करून चाकणकरांना मंत्रमुग्ध केले आहे.

## रक्ताचा तुटवडा टाळण्यासाठी चाकणला बुधवारी महारक्तदान शिबिर

■ चाकण (दै. संध्या)

अपघात ग्रस्तांचे प्राण वाचविण्यासाठी आणि रक्ताचा तुटवडा टाळण्यासाठी चाकण येथे बुधवारी (दि.२३) महा रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती चाकण नगर परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रूपालीताई कांडगे यांनी दिली. चाकण शहराचे माजी नगरसेवक राहुलदादा किसनराव कांडगे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून जय भारत ग्रुपच्या वतीने समाजोपयोगी आणि उपक्रमशील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. चाकण येथे बुधवारी (दि.२३ सप्टेंबर ) सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत रुद्राक्ष हॉटेल, जय भारत चौक, चाकण येथे हे भव्य रक्तदान शिबिर पार पडणार आहे. या रक्तदान शिबिरासाठी तत्त्व लॅब यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे. 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान'या सामाजिक संदेशासोबतच'रक्तदानाने वाचवा दुसऱ्याचा जीव आणि हेलमेटने सुरक्षित ठेवा स्वतःचा जीव' असा दुहेरी संदेश या माध्यमातून दिला जात आहे. या शिबिरात रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याला जय भारत ग्रुपच्या वतीने सन्मानपूर्वक'हेलमेट'भेट देऊन गौरविण्यात येणार आहे. विशेष म्हणजे



तरुणांसाठी रोजगाराभिमुख कौशल्य विकास मोहीम राबविली जाणार आहे. रक्तदान शिबिरासोबतच परिसरातील १८ ते ३५ वर्षे वयोगटातील तरुण व तरुणींसाठी 'सोना कॉमस्टार आणि टाटा स्ट्राइव्ह कौशल्य विकास केंद्र, चाकण' यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत रोजगाराभिमुख अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले आहेत. फायनान्स व अकाउंटिंग, असिस्टंट इलेक्ट्रिशियन, ऑटोमोटिव्ह सीएनसी मशिनिंग तंत्रज्ञ, कस्टमर इंटरॅक्टिव्ह सर्व्हिसेस या प्रशिक्षणा सोबतच विद्यार्थ्यांना संगणक ज्ञान, इंग्रजी संभाषण, व्यावसायिक कौशल्ये, व्यक्तिमत्त्व विकास आणि थेट नोकरीसाठी प्लेसमेंट सहाय्यता पुरवली जाणार असल्याचे नगरसेविका रूपाली कांडगे व नगरसेवक राहुल कांडगे यांनी सांगितले.

# शारदाबाई पवार महिला कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती

■ शारदानगर(दै. संध्या)

येथील शारदाबाई पवार महिला कनिष्ठ महाविद्यालयातील 14 विद्यार्थिनींना शैक्षणिक शिष्यवृत्ती मिळाली आहे.

महाविद्यालयातील एकूण 14 विद्यार्थिनींना दोन संस्थांच्या वतीने ही शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. यामध्ये परिमल व प्रमोद चौधरी फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने इयत्ता ११ वी च्या चार विद्यार्थिनींना एकूण रुपये ८७,३२०/- इतकी शिष्यवृत्ती मिळाली आहे तर इयत्ता १२ वी च्या नऊ विद्यार्थिनींना रुपये १,९५,९४५/- इतकी शिष्यवृत्ती मिळाली आहे.

इयत्ता ११ वी शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थिनी : १)कु. आर्या काळे - रुपये ३०,२५५/- २)कु. तेजस्विनी माने - रुपये २०,७५५/- ३) कु. सानिका कदम - रुपये २०,३५५/- ४) कु. प्रणवी कदम - रुपये १५,०५५/- इयत्ता १२ वी शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थिनी - १) वैष्णवी घुटुकडे - रुपये २६,३०५/- २) प्रणाली भिंताडे - रुपये २५,१०५/- ३) दिव्या माने - रुपये २५,१०५/- ४) सई बाळापुरे - रुपये २१,३०५/- ५) श्रेया कदम - रुपये २१,३०५/- ६) सृष्टी जगताप - रुपये २०,१०५/- ७) तनिष्का भोसले - रुपये २०,८०५/- ८) राजनंदिनी घोलप - रुपये २०,८०५/- ९) नेहा मारकड - रुपये -१५,१०५/- तसेच जे.एम. फायनान्शियल फाउंडेशन, मुंबई यांच्यातर्फे कु. अदिती गदादे या विद्यार्थिनीला रुपये २५,०००/- इतकी शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.

या सर्व गुणवंत विद्यार्थिनींचे ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे




चेअरमन मा.राजेंद्रदादा पवार, संस्थेच्या विश्वस्त सौ. सुनंदा पवार तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. आर. बी.देशमुख सर, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुख श्री. पी. आर. इंगळे सर व कला व वाणिज्य प्रमुख श्री. जी. एच. धनवे सर यांनी अभिनंदन केले. तसेच ही शिष्यवृत्ती प्राप्त करणेसाठी सौ.रेश्मा साळुंके, श्री. एस. एस. होनमुटे व सहकारी यांनी विशेष प्रयत्न केलेबद्दल त्यांचेही अभिनंदन केले व विद्यार्थिनींना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे



### कवठे येमाईच्या ढाकी वस्ती नजीक मृत कोंबड्यांचा खच; बिबट्याच्या वावराने भीती

**कवठे येमाई : दैनिक संध्या**

शिरूर तालुक्यातील कवठे - मिडगुलवाडी रस्त्यालगत ढाकी वस्ती परिसरातील शेतांमध्ये व वनविभागाच्या हद्दीत मृत कोंबड्या उघड्यावर टाकल्या जात असल्याने परिसरात दुर्गंधी व अस्वच्छता पसरली आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून, परिसरात बिबट्याचा वावर असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मृत कोंबड्यांमुळे भटक्या कुत्र्यांसह वन्यप्राण्यांचा वावर वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. याच आठवड्यात बिबट्याने तीन शेळ्यांवर हल्ला करून त्या ठार केल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.मृत कोंबड्यांची शास्त्रोक्त विल्हेवाट लावावी, उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करावी आणि परिसराची तातडीने स्वच्छता करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी आरोग्य विभाग व ग्रामपंचायतीकडे केली आहे.

### एल अँड टी फायनान्स (LTF) ची पाइन लॅब्स सोबत भागीदारी

L&T Finance

**पुणे : दैनिक संध्या**

देशातील आघाडीच्या बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्यांपैकी (NBFCs) एक असलेल्या एल अँड टी फायनान्स लिमिटेड (LTF) ने, आघाडीची जागतिक पेमेंट्स तंत्रज्ञान कंपनी असलेल्या पाइन लॅब्स लिमिटेडसोबत भागीदारी केल्याची घोषणा केली आहे. ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६ मध्ये एल अँड टी फायनान्स प्लॅनेट ॲपमध्ये एजेंटिक स्टोअरफ्रंट समाविष्ट करण्यासाठी ही भागीदारी करण्यात आली आहे. या सहकार्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता एजंट्सना नियंत्रित चौकटीत सुरक्षितपणे संवाद साधता येईल आणि व्यवहार पूर्ण करता येतील, ज्यामुळे एजेंटिक कॉमर्स सक्षम होईल. या भागीदारीची सुरुवात पहिल्या वापराच्या उदाहरणाच्या रूपात विमान तिकीट बुकिंगपासून होत आहे. यामुळे ग्राहकांशी होणारा संवाद केवळ संवादात्मक चॅटबॉट्सपुरता मर्यादित न राहता, सुरुवातीपासून शेवटपर्यंत स्वायत्त पद्धतीने व्यवहार पूर्ण करण्याच्या पातळीवर पोहोचेल. या घडामोडीवर भाष्य करताना, एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अर्बन अनसिक्योर्ड ॲसेट्स, पेमेंट्स अँड डिजिटल पार्टनरशिप्स विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. मनीष कुमार गुप्ता, म्हणाले, "आमच्या ग्राहकांच्या आर्थिक आणि जीवनशैलीशी संबंधित प्रवासांना सुलभ करण्यासाठी अत्याधुनिक डिजिटल नवकल्पनांचा वापर करणे हे एल अँड टी फायनान्समधील आमचे नेहमीच उद्दिष्ट राहिले आहे. एल अँड टी फायनान्स प्लॅनेट ॲपवर एजेंटिक स्टोअरफ्रंट सादर करण्यासाठी पाइन लॅब्स सोबत केलेली भागीदारी ही संवादात्मक सहाय्यापासून प्रत्यक्ष व्यवहाराच्या अंमलबजावणीकडे होणारा एक महत्त्वपूर्ण बदल दर्शवते. वापरकर्त्यांनी निश्चित केलेल्या नियंत्रण मर्यादांमध्ये सुरक्षितपणे कार्य करणाऱ्या स्वायत्त कृत्रिम बुद्धिमत्ता एजंट्सच्या माध्यमातून आम्ही अत्यंत वैयक्तिकृत, सुलभ आणि प्रयत्नरहित कॉमर्स व पेमेंट्सचा अनुभव निर्माण करत आहोत. विमान बुकिंग ही केवळ सुरुवात आहे; नजीकच्या भविष्यात ही रचना अनेक व्यापारी श्रेणींमध्ये विस्तारली जाईल."

### सतेज पाटील यांनी घेतली वीर बंडा पाटील रेठरेकरांच्या उपचाराची जबाबदारी

**शाहुवाडी: दैनिक संध्या**

तालुक्याच्या लाल मातीतला हिरा ऑलम्पिक पैलवान वीर बंडा पाटील रेठरेकर यांच्यावर उपचार करण्याची आमदार सतेज पाटील यांनी जबाबदारी घेतली, त्यांच्यावर डॉ डी वाय पाटील हॉस्पिटल मध्ये उपचार सुरू करण्यात आले. चार दिवसापूर्वी बंडा पाटील आजारी उतारवयात त्यांच्या औषध उपचाराची हेळसांड या बाबत वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्या पार्श्वभूमीवर, आमदार सतेज पाटील यांच्या कार्यकर्त्यांनी भेट देऊन एक लाख रुपयाची तात्काळ मदत केली होती. पुढील जबाबदारी देखील स्वीकारली होती. बंडा पाटील गेली काही दिवस ते प्रकृती अस्वाथ्यामुळे रुग्णालयात उपचार घेत होते. परंतू त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती त्यांच्यावर वृत्त प्रसिध्द केले होते. त्या पार्श्वभूमीवर आमदार सतेज पाटील यांना समजताच बंडा पाटील यांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला. आपल्या माध्यमातून त्यांनी तात्काळ एक लाख रुपयांची मदत केलीच. शिवाय डॉ डी वाय पाटील हॉस्पिटलमध्ये पूर्ण उपचार मोफत करण्याची ग्वाही दिली. बंडा पाटील यांना रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच आमदार सतेज पाटील यांनी सर्व यंत्रणा सक्रिय केलेली होती. दवाखान्यात अत्यावश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून ठेवल्या होत्या. आपल्या घरातीलच सदस्य आजारी असल्याच्या भावनेतून आमदार सतेज पाटील यांचे कार्यकर्ते प्रवीण केसरकर व त्यांचे सहकारी दवाखान्यात थांबून होते.

### गंजी गल्ली हल्लाप्रकरणी संशयितांना पोलीस कोठडी



**कोल्हापूर : दैनिक संध्या**

सोमवार पेठ, गंजी गल्ली येथील सागर पाटोळे आणि प्रसाद बुलबुले कुटुंबीयांत पूर्ववैमनस्यातून झालेल्या हाणामारीप्रकरणी लक्ष्मीपुरी पोलिसांनी तिघांना अटक केली. दोघांना पोलिस कोठडी, तर अल्पवयीन तरुणाची बालसुधारगृहात रवानगी करण्यात आली आहे. गुरुवारी दुपारी सोमवार पेठ, गंजी गल्ली येथे झालेल्या वादावादीत गळ्यावर धारदार चाकूने हल्ला झाल्याने सागर बाळकृष्ण पाटोळे (वय ३६, रा. गंजी गल्ली) याची प्रकृती गंभीर बनली. त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले. त्याच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, पाटोळे यांच्यावरील हल्लाप्रकरणी लक्ष्मीपुरी पोलिसांनी अटक केलेल्या प्रमोद बुलबुले (वय ५२) व राजू बुलबुले (२३, रा. गंजी गल्ली, कोल्हापूर) यांना न्यायालयात हजर करण्यात आले. त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली. अल्पवयीन तरुणाची बालसुधारगृहात रवानगी करण्यात आल्याचे तपास अधिकारी श्रीराम कन्हेरकर यांनी सांगितले.

# सेवा संकल्प अभियान' लोकाभिमुख पद्धतीने राबवून पात्र नागरिकांना योजनांचा थेट लाभ द्या : जिल्हाधिकारी

■ पुणे(दै. संध्या)

'सेवा संकल्प अभियान' हे केवळ विविध कार्यक्रमांच्या आयोजनापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष नागरिककेंद्रित झाले पाहिजे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना आणि सेवा पात्र नागरिकांपर्यंत सुलभपणे पोहोचवून त्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यास प्राधान्य द्यावे. अभियानातील प्रत्येक उपक्रमाचे सूक्ष्म नियोजन करून सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने आणि कालबद्ध पद्धतीने अंमलबजावणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले.



राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून शासनाच्या विविध सेवा सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच लोकसहभागातून विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

जिल्हाधिकारी डुडी यांनी सांगितले की, अभियानांतर्गत पुणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात 'सेवा सेतू' शिबिरांचे नियोजन करावे तसेच इतर सर्व विभागांनी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा पात्रतेनुसार लाभ नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा. 'आपले सरकार सेवा केंद्रां'च्या माध्यमातून अर्ज प्रक्रिया पूर्ण करून शक्य त्या सेवा शिबिराच्या ठिकाणीच उपलब्ध करून द्याव्यात. तसेच छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरांचेही नियोजन करावे.

वन हक्क दाव्यांच्या अनुषंगाने ग्रामस्तरीय, तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय वन हक्क समित्यांच्या बैठका घेऊन नवीन दावे तसेच पूर्वीच्या दाव्यांमधील दुरुस्तीची कार्यवाही गतिमान करावी. मंजूर वन हक्क दाव्यांनुसार अधिकार अभिलेख तयार करण्याची कार्यवाही पूर्ण करावी. प्रलंबित दावे अभियान कालावधीत निकाली काढण्यासाठी संबंधित विभागांनी निश्चित वेळापत्रक तयार करावे, असेही त्यांनी सांगितले.

'सेवा सेतू' शिबिरांच्या माध्यमातून प्रलंबित फेरफार नोंदींचा निपटारा, जिवंत सातबारा मोहीम, गावठाणातील नागरिकांना स्वामित्व सनद, पाणंद रस्ते, पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिका, नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र, वन हक्क दावे, मालमत्ता हस्तांतरण नोंद, नवीन नळ जोडणी, घरगुती वीज जोडणी, दिव्यांग प्रमाणपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, आधार कार्ड, जन्म-मृत्यू नोंद व प्रमाणपत्र, शिकाऊ वाहनचालक परवाना, महिला बचतगट नोंदणी, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र तसेच ७/१२ व ८-अ नोंदी अद्ययावत करण्यासह शासन निर्णयात नमूद सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी आवश्यक पूर्वतयारी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डुडी यांनी दिले.

सेवा माझे योगदान'या उपक्रमातून गाव आणि वॉर्ड स्तरावर व्यापक लोकसहभाग निर्माण करावा. युवक, महिला, ज्येष्ठ नागरिकांसह शिक्षण, कला, साहित्य, क्रीडा आणि समाजसेवा क्षेत्रातील व्यक्तींना सहभागी करून घ्यावे. स्थानिक गरजेनुसार रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, 'स्वच्छता ही सेवा', आरोग्य तपासणी, योग व ध्यान, प्लास्टिकमुक्ती जागृती, महिला आरोग्य व स्वच्छता, वंचित मुलांसाठी शैक्षणिक सहकार्य, करिअर समुपदेशन आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी डिजिटल साक्षरता यासारखे उपक्रम राबवावेत.

अवयवदान संकल्प अभियान, व्यसनमुक्त भारत जागृती, पोषण व ॲनिमिया जागृती, रस्ता सुरक्षा, जलसंधारण व जलस्रोत स्वच्छता, कचरा वर्गीकरण व कंपोस्टिंग, सायबर सुरक्षा, 'फिट इंडिया' खेळ सत्र, वीरगाथा व सैनिकांचा सन्मान, दिव्यांगजन सहयोग, मतदार जागृती व नोंदणी, 'व्होकल फॉर लोकल', शासकीय योजनांची जनजागृती आणि विद्यार्थ्यांना आवश्यक प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यासारख्या उपक्रमांचेही स्थानिक गरजेनुसार नियोजन करावे. ग्रामीण भागात गटविकास अधिकारी, तर शहरी भागात मुख्याधिकारी अथवा वॉर्ड अधिकारी नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील.

पुणे जिल्ह्यातील ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावरील यंत्रणांनी 'सेवा संकल्प अभियान' प्रभावीपणे राबविण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा. 'सेवा माझे योगदान' अंतर्गत गावागावांत स्थानिक गरजेनुसार स्वच्छता, वृक्षारोपण, आरोग्य, जलसंधारण, प्लास्टिकमुक्ती, डिजिटल साक्षरता आणि शासकीय योजनांच्या जनजागृतीचे उपक्रम लोकसहभागातून राबवावेत.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ गावातील शेवटच्या पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचविणे, ग्रामस्तरावर व्यापक लोकसहभाग निर्माण करणे आणि राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे प्रभावी दस्तऐवजीकरण करणे यावर विशेष भर द्यावा. पंचायत समिती आणि ग्रामपंचायत स्तरावरील यंत्रणेने अभियानातील उपक्रमांचे वेळापत्रक निश्चित करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी.

शासनाच्या विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांच्या घरी जाऊन 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित करण्याचा उपक्रम राबवावा. योजनांमुळे नागरिकांच्या जीवनमानात झालेल्या सकारात्मक बदलांच्या 'बदलाची गोष्ट' स्वरूपातील यशोगाथा संकलित कराव्यात. लाभार्थ्यांच्या प्रतिक्रिया नावासह व्हिडिओ स्वरूपात नोंदवून व्हिडिओ व रिल्स तयार करावेत. तालुका व जिल्हास्तरावर योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या विभागांनी प्रभावी यशोगाथा संकलित कराव्यात.

शाळा, महाविद्यालये आणि ग्रामपंचायत स्तरावर कला व नाट्य पथकांच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या जनकल्याणकारी योजनांची माहिती देणारे 'नमो सेवागाथा' कार्यक्रम आयोजित करावेत. स्थानिक कलाकार, विद्यार्थी व शिक्षकांचा सहभाग वाढवावा. २ ऑक्टोबर २०२६ रोजी तालुकास्तरावर कार्यक्रम आयोजित करण्याची तरतूद शासन निर्णयात करण्यात आली आहे. 'अंगणवाडी उत्सव' उपक्रमांतर्गत अंगणवाडी केंद्रांवर मुलांसोबत मातांनाही सहभागी करून घ्यावे.

महिलांना आरोग्य व पोषणविषयक योजनांची माहिती द्यावी. लहान मुलांसाठी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करावेत. अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि आशा कार्यकर्त्यांचा यथोचित सन्मान करावा. लाभार्थी महिलांना शासनाच्या पोषण व आरोग्य योजनांमुळे झालेल्या लाभाचे अनुभव कथन करण्यासाठी प्रोत्साहित करावे.

#### उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी


अभियानातील कार्यक्रम केवळ संख्यात्मक स्वरूपात न राबविता त्यातून नागरिकांना प्रत्यक्ष सेवा आणि योजनांचा लाभ मिळणे महत्त्वाचे आहे. विशेषतः पात्र लाभार्थ्यांची ओळख, प्रलंबित अर्जांचा निपटारा आणि शक्य त्या सेवा शिबिराच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा. अभियानाचा लाभ शेवटच्या पात्र घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे जिल्हाधिकारी डुडी यांनी सांगितले. अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे फोटो, व्हिडिओ आणि रिल्सच्या माध्यमातून व्यवस्थित दस्तऐवजीकरण करावे. संबंधित विभागांनी आपल्या कामांचे व्हिडिओ चित्रीकरण, रिल्स व छायाचित्रे संकलित करून माहिती व जनसंपर्क यंत्रणेकडे वेळेत उपलब्ध करून द्यावीत.

## रक्तदानातून सामाजिक बांधिलकीचा संदेश; कवठे येमाईत १२० जणांचे रक्तदान

■ कवठे येमाई (दै. संध्या)

सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने श्री गुरुदेव दत्त ग्रामविकास प्रतिष्ठान, कवठे येमाई ता.शिरूर यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला परिसरातील नागरिक व तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तब्बल १२० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक कर्तव्याची जाणीव जपली.

'सेवा हेच धर्म' हे ब्रीदवाक्य उराशी बाळगून प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. सकाळी ८ ते सायंकाळी ६ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात रक्तदात्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास भविष्यात गरज पडल्यास एक रक्तपिशवी मोफत उपलब्ध करून देण्याची सुविधा देण्यात आली. तसेच रक्तदात्यांना प्रोत्साहन म्हणून वॉटर जॅकेट अथवा हेल्मेट यापैकी एक भेटवस्तू देण्यात आली.शिबिर दरम्यान उपस्थितांना रक्तदानाचे आरोग्यविषयक फायदे, रक्तदाब व रक्तातील साखर नियंत्रणाचे महत्त्व तसेच गरजू रुग्णांना रक्त उपलब्ध करून देण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. 'एका रक्तदानातून तीन जणांचे प्राण वाचू शकतात' हा सामाजिक संदेश देत नियमित रक्तदानाचे आवाहन करण्यात आले.शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल परिसरातील ग्रामस्थ व नागरिकांनी प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक केले. आयोजकांनी रक्तदाते, वैद्यकीय पथक, सेवाभावी कार्यकर्ते व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.



## गणेशम फेज २ सोसायटीत आग

### दोन चिमुरड्यांची सुखरूप सुटका

■ पिंपरी (दै. संध्या)

शहरातील 'गणेशम फेज २' सोसायटीमध्ये अचानक आग लागल्याची थरारक घटना घडली. आगीचे वृत्त समजताच नगरसेवक श्री शत्रुघ्न काटे यांनी अत्यंत तत्परता दाखवत तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि त्वरित अग्निशमन दलाला पाचारण केले. या घटनेत आगीच्या भक्ष्यस्थानी सापडलेल्या एका रूममध्ये दोन लहान मुली अडकल्या होत्या; मात्र अग्निशमन दलाच्या जवानांनी त्यांना सुरक्षितपणे बाहेर काढल्याने मोठा अनर्थ टळला आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

नगरसेवक श्री शत्रुघ्न काटे यांनी दिलेल्या सूचनेनुसार, अग्निशमन दलाच्या गाड्या काही वेळातच घटनास्थळी दाखल झाल्या. आगीत दोन लहान मुले अडकल्याचे समजताच जवानांनी जीवाची बाजी लावत तातडीने बचावकार्य सुरू केले आणि त्या दोन्ही चिमुरड्यांची सुखरूप सुटका केली. सध्या जवानांकडून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले जात आहेत. ही आग नेमकी कशामुळे लागली, याचे प्राथमिक कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी दाखवलेली सतर्कता आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी दाखवलेले धाडस व वेगवान हालचालींमुळे संभाव्य जीवितहानी टळण्यास मोठी मदत झाली आहे. प्रशासनाकडून आणि अग्निशमन दलाकडून आगीवर लवकरच पूर्णपणे नियंत्रण मिळवण्यात येईल,अशी माहिती देण्यात आली आहे.




## अपुऱ्या पावसामुळे शेतकरी संकटात; शरद पवारांचे मुख्यमंत्री फडणवीसांना पत्र

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील बहुतांश भागात अपुऱ्या पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान होत असून शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण जनजीवन संकटात सापडले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. औपचारिक निकषांची प्रतीक्षा न करता राज्यात दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना हेक्टरी किमान ५० हजार रुपये मदत द्यावी, अशी प्रमुख मागणी पवार यांनी केली आहे.

राज्यातील अनेक भागांत पावसाने पाठ फिरवल्याने सोयाबीन, कापूस, बाजरी, मका, तूर, मूग आणि उडीद या पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. पावसाअभावी उभी पिके करपली असून कीड-रोगांचा प्रादुर्भावही वाढला आहे. त्यामुळे शेतीबरोबरच पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता असल्याचे पवार यांनी पत्रात नमूद केले आहे.





गंभीर परिस्थिती असलेल्या तालुक्यांना तातडीने दुष्काळसदृश परिस्थितीग्रस्त घोषित करून दुष्काळी सवलती लागू कराव्यात, अशी मागणीही त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांना हेक्टरी किमान ५० हजार रुपये, तर प्रत्येक शेतमजूर कुटुंबाला २५ हजार रुपये विशेष मदत देण्यात यावी, असे पवार यांनी म्हटले आहे.

आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी योजना तातडीने लागू करून पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी पवार यांनी केली. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दिले जाणारे प्रोत्साहनपर अनुदान ५० हजारांवरून एक लाख रुपये करावे. तसेच २०२५-२६ मध्ये पीककर्ज घेतले आणि यंदा ते थकीत झाले, अशा शेतकऱ्यांचाही कर्जमाफी योजनेत समावेश करावा, असे त्यांनी सुचविले.

पीकविम्याबाबतही पवार यांनी सरकारकडे विविध मागण्या केल्या आहेत. एक रुपयातील पीकविमा योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करावी आणि शेतकरी हितासाठी पूर्वी वगळण्यात आलेले सर्व ट्रिगर पुन्हा लागू करून पीकविम्याचे संरक्षण द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. गेल्या वर्षी अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीसाठी जाहीर केलेली हेक्टरी १७ हजार रुपयांची मदतही तातडीने वितरित करावी, असे त्यांनी म्हटले आहे.

दुष्काळसदृश परिस्थिती असलेल्या तालुक्यांत रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून विशेष कामे हाती घ्यावीत. शेती, जलसंधारण आणि इतर ग्रामीण कामांना प्राधान्य द्यावे. फळबागा वाचविण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी पवार यांनी केली. पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या गावांचे तातडीने सर्वेक्षण करून आवश्यकतेनुसार शासकीय टँकर सुरू करावेत. मागणीनुसार चारा छावण्या सुरू करण्याबरोबरच पशुधनासाठी पिण्याचे पाणी आणि पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून द्याव्यात, असे त्यांनी म्हटले आहे. दुष्काळी परिस्थितीत लोडशेडिंगची समस्या वाढण्याची शक्यता लक्षात घेता विद्युत रोहित्रांच्या दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी ऊर्जा विभागामार्फत विशेष मोहीम राबवावी, अशी मागणीही पवार यांनी केली.

राज्यातील परिस्थितीवर दररोज देखरेख ठेवण्यासाठी राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय नियंत्रण कक्ष सुरू करावेत. या कक्षांमार्फत पर्जन्यमान, पिकांची स्थिती, पाणीटंचाई, चारा उपलब्धता आणि पशुधनाची स्थिती यावर सातत्याने लक्ष ठेवावे, असे पवार यांनी सुचविले. दुष्काळसदृश परिस्थिती असलेल्या तालुक्यांतील शाळा, महाविद्यालये आणि इतर शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांचे केवळ परीक्षा शुल्क नव्हे, तर संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफ करावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे. शेतकरी, शेतमजूर, पशुधन आणि ग्रामीण जनजीवनावर निर्माण झालेल्या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा आणि आवश्यक मदतकार्य सुरू करावे, अशी अपेक्षा पवार यांनी व्यक्त केली.






# जेजुरी(लवथळेश्वर) गौरी सजावट



www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews





सौ. सई प्रवीण आवळे




सौ.निशा गणेश खळदकर, खळद,तालुका पुरंदर,जिल्हा पुणे.




दीपा कुलकर्णी यांची साधी सजावट



सौ.कल्पना क्षीरसागर व प्राजक्ता क्षीरसागर




सौ. सुनिता बाळासाहेब लेंडे



सौ. प्रमिला कोंडे



सौ. सुरेखा सावंत-मते, पुणे



सौ. मानसी महेश देशपांडे





अधर्म, अहंकार आणि अत्याचाराने त्रस्त झालेल्या देवगणांना मुक्त करण्यासाठी ललिता त्रिपुरसुंदरी देवी आपल्या शक्तिरूपातून प्रकट होतात. त्यांच्या सोबत मंत्रीणी देवी आणि वाराही देवी अधर्माचे प्रतीक असलेल्या भंडासूर राक्षसाशी महासंग्राम करतात आणि अखेरीस त्याचा वध करून धर्म व सत्याचा विजय प्रस्थापित करतात, असा स्त्री शक्ती चा जागर करणारा 'ललिता त्रिपुरसुंदरी – भंडासूर वध' हा सजीव देखावा सदाशिव पेठेतील खजिना विहीर तरुण मंडळातर्फे साकारण्यात आला आहे.



सौ. सुखदा योगेश केंजळे